सायं.दैनिक

नांदेड वार्ता

दीपावली

निमित्त सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा....!

। वर्ष २५ वे । अंक ४६ । सोमवार दि. ९ नोव्हेंबर २०२६ । नांदेड पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ पाने ८ । स्वागत मुल्य १० रु.

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रकाशाचा सण. वर्षभर कष्ट करून मिळविलेल्या उत्पन्नातून घराची स्वच्छता करणे, नवीन कपडे खरेदी करणे, गोडधोड पदार्थ बनविणे आणि कुटुंबीयांसोबत आनंदाने सण साजरा करणे, ही आपली परंपरा आहे. मात्र याच दिवाळीच्या उंबरठ्यावर महाराष्ट्रातील अनेक शेतकरी कुटुंबांसमोर एक गंभीर प्रश्न उभा आहे. घरात दिवा लावायचा कसा? मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणायचा कसा? आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्याने दिवाळी साजरी तरी कशी करायची?

– डॉ.विकास सुकाळे,
प्राचार्य,
पीपल्स कॉलेज,नांदेड.



शेतकऱ्याच्या आयुष्यात दिवाळीचा प्रकाश कधी येणार?

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचा खंड, पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची कमतरता, जनावरांसाठी चारा नसणे, शेतीमालाला योग्य भाव न मिळणे आणि वाढते कर्ज यामुळे शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत कठीण झाले आहे. शेतकऱ्यांच्या घरातील आर्थिक परिस्थिती एवढी बिकट झाली आहे की, दिवाळीचा सण आनंदाचा न राहता चिंतेचा विषय बनला आहे.

पावसाअभावी शेतीचे आर्थिक गणित कोलमडले

महाराष्ट्रातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. शेतकरी जून महिन्यापासून खरीप हंगामाच्या तयारीला लागतो. मशागत, बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि पेरणीसाठी मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करतो. अनेक शेतकरी बँकेकडून पीककर्ज घेतात, तर काही खासगी सावकारांकडून पैसे उचलतात.

परंतु पेरणीनंतर पावसाने दडी मारली, तर शेतकऱ्याचे संपूर्ण आर्थिक नियोजन कोलमडते. पिकांची वाढ खुंटते, पिके करपतात आणि उत्पादनात मोठी घट होते. काही शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित उत्पादनही येत नाही.म्हणजेच पेरणीसाठी केलेली गुंतवणूक वाया जाण्याची वेळ आली आहे. उत्पन्नाचा स्रोतच बंद झाल्याने दिवाळी साजरी करण्यासाठी पैसा आणायचा कुठून?, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

दुष्काळाची परिस्थिती आणि सरकारी मदतीचा प्रश्न

दुष्काळाची तीव्रता केवळ पावसाच्या आकडेवारीवरून समजत नाही. पिकांची अवस्था, विहिरींची पाणीपातळी, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांसाठी चारा या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

दुष्काळग्रस्त परिस्थितीत शासनाकडून मदतीच्या घोषणा केल्या जातात. मात्र त्या मदतीचा लाभ प्रत्येक गरजू शेतकऱ्यापर्यंत वेळेत पोहोचतोच असे नाही. पंचनामे, कागदपत्रांची पडताळणी आणि प्रशासकीय प्रक्रिया यामध्ये वेळ जातो. त्यामुळे शेतकऱ्याला प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत त्याच्यासमोर अनेक आर्थिक संकटे उभी राहतात.

आज शेतकऱ्याला घोषणांपेक्षा प्रत्यक्ष आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. नुकसानभरपाईची रक्कम वेळेत मिळणे आणि मदतीच्या प्रक्रियेत पारदर्शकता असणे अत्यंत गरजेचे आहे.

जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न

शेतीबरोबरच पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. गाय, म्हैस, बैल आणि शेळ्या ही शेतकऱ्याची संपत्ती आहे. शेतीतून उत्पन्न मिळाले नाही, तरी पशुपालनातून काही आर्थिक आधार मिळतो.

मात्र दुष्काळामुळे हिरवा चारा आणि पाण्याची उपलब्धता कमी होत आहे. विहिरींची पाणीपातळी खालावत आहे. चाऱ्याचे दर वाढल्यामुळे जनावरे सांभाळणेही कठीण झाले आहे. काही शेतकऱ्यांना आपली जनावरे विकण्याची वेळ आली आहे.

अनेक वर्षे कुटुंबाचा आधार असलेली जनावरे विकावी लागणे ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत वेदनादायक बाब आहे. त्यामुळे शासनाने प्रत्येक दुष्काळग्रस्त तालुक्यात चारा डेपो, आवश्यकतेनुसार चारा छावण्या आणि जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.

खासगी सावकारांचा तगादा आणि शेतकऱ्यांची मानसिक अवस्था

यासंबंधी नांदेड येथील केएफ फायनान्स कँपनीचे प्रकरण ताजे आहे. मुदखेड तालुक्यातील एका सामान्य कुटुंबातील शेतकऱ्याला घरातून आणले आणि डांबून ठेवले. त्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाला. कर्ज वसुली न झाल्यामुळे शेतकऱ्यांना डांबून ठेवण्याचा प्रकार महाराष्ट्रात कमी-अधिक प्रमाणात सर्वत्र चालू आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांसमोरील सर्वांत मोठे संकट म्हणजे कर्जाचे. खरीप हंगामासाठी घेतलेले कर्ज पीक आल्यानंतर फेडण्याची शेतकऱ्याची अपेक्षा असते. परंतु पीकच आले नाही, तर कर्जाची परतफेड कशी करायची? एकीकडे शेतीतून उत्पन्न नाही, दुसरीकडे घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि जनावरांच्या चाऱ्याचा खर्च आहे. अशा परिस्थितीत खासगी सावकारांकडून वसुलीसाठी तगादा लावला जात असेल, तर शेतकऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता असते.

कर्जवसुलीच्या नावाखाली धमकावणे, अपमानित करणे किंवा मानसिक त्रास देणे, अशा प्रकारांना कोणत्याही परिस्थितीत समर्थन देता येणार नाही. शासनाने अशा बेकायदेशीर वसुलीविरोधात कठोर कारवाई करून शेतकऱ्यांना कायदेशीर संरक्षण द्यावे.

शेतकरी संकटाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम

शेतकरी हा केवळ अन्नधान्य पिकविणारा घटक नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधार आहे. शेतकऱ्याच्या हातात पैसा आला की तो बाजारपेठेत खर्च करतो. कपडे, किराणा, कृषी साहित्य, शिक्षण आणि इतर गरजांसाठी खरेदी करतो.

मात्र शेतकऱ्याच्या हातातच पैसा नसेल, तर संपूर्ण ग्रामीण बाजारपेठेवर त्याचा परिणाम होतो. किराणा दुकानदार, कापड व्यावसायिक, कृषी सेवा केंद्रे, हॉटेल व्यावसायिक, छोटे कारागीर आणि इतर लघुउद्योग आर्थिक अडचणीत येतात.दिवाळीसारख्या मोठ्या सणाच्या काळात बाजारपेठेत होणारी आर्थिक उलाढाल कमी होते. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच छोटे व्यापारी आणि व्यावसायिकही संकटात सापडतात.यावरून स्पष्ट होते की, शेतकरी संकटात सापडला तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्र विस्कळीत होते.

....दिवाळीचा सण आणि शेतकऱ्यांच्या घरातील वास्तव

दिवाळी हा आनंदाचा सण असला तरी अनेक शेतकरी कुटुंबांसाठी तो चिंतेचा विषय बनला आहे.

पान ४ वर

माहूर नगर पंचायत, माहूर जि.नांदेड

फोन नं.-०२४६०२८६१७५
जा.क्रं.२०२६/नपंमा/वि.यो/टे-१/

Email ID-mahurco@gamil.com
दिनांक :-०५/११/२०२६

सार्वजनिक जनजागृती आवाहन

पाणी वाचवा- जीवन वाचवा!

सर्व जनतेस

दीपावली

निमित्त मन:पूर्वक शुभेच्छा!

माहूर शहरातील सर्व नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, पाण्याची उपलब्धता मर्यादित होण्याची शक्यता लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने पाण्याचा वापर अत्यंत जपून व काटकसरीने करणे आवश्यक आहे. पाणी हे मानवी जीवनातील अत्यंत महत्वाचे नैसर्गिक साधन असून पाण्याचा अनावश्यक आहे. पाणी हे मानवी जीवनातील अत्यंत महत्वाचे नैसर्गिक साधन असून पाण्याचा अनावश्यक वापर व अपव्यय केल्यास भविष्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

नागरिकांनी खालील सूचनांचे पालन करावे :

१. नळाद्वारे मिळणारे पाणी आवश्यकतेपुरतेच वापरावे.
२. पिण्याच्या पाण्याचा वापर वाहन धुणे, अंगण धुणे व इतर अनावश्यक कामांसाठी करु नये.
३. घरातील पाण्याच्या टाक्या भरल्यानंतर नळ त्वरित बंद करावेत.
४. सार्वजनिक नळांमधून पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
५. आपल्या परिसरातील इतर नागरिकांनाही पाणी बचतीबाबत जागरुक करावे.

नगर पंचायत प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

शहरातील उपलब्ध पाणीसाठा सर्व नागरिकांना योग्य प्रमाणात उपलब्ध व्हावा. यासाठी प्रशासनाकडून आवश्यक नियोजन व उपाययोजना करण्यात येत आहेत. तथापि, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्वाचे आहे. प्रत्येक कुटुंबाने पाण्याची बचत करण्याचा संकल्प करावा व इतरांनाही त्यासाठी प्रोत्साहित करावे. आज पाणी वाचवाल, तर उद्याचे भविष्य सुरक्षित कराल!

पाणी अडवा – पाणी जिरवा – पाणी वाचवा!




शुभेच्छुक

स्वाक्षरित/- (विवेक भारत कांदे) मुख्याधिकारी नगर पंचायत,माहूर

स्वाक्षरित/- (ज्ञानेश्वर नारायण लाड) उपाध्यक्ष नगर पंचायत,माहूर

स्वाक्षरित/- (फिरोज हाजी अ.कादर दोसानी) अध्यक्ष नगर पंचायत,माहूर

व सर्व नगरसेवक, नगरसेविका व कर्मचारी वृंद नगर पंचायत,माहूर



संपादकीय

दिवाळीचा उजेड अन् वास्तवाचा अंधार!

एका बाजूला दुष्काळाचे सावट, दुसरीकडे विद्यार्थ्यांचे आंदोलन, लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी राजकीय संघर्ष; अशा अस्वस्थ वातावरणात यंदाची दिवाळी साजरी होत आहे. बाजारपेठेतील झगमगाट आणि सामान्य माणसाच्या जगण्यातील अंधार यातील तफावत अंतर्मुख करणारी आहे. यंदाची दिवाळी अनेक अर्थांनी वेगळी आणि महत्त्वपूर्ण ठरणारी आहे. दिवाळी म्हटले की आनंद, उत्साह, रोषणाई, फराळ, नवीन कपडे आणि खरेदीची लगबग असे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. अंधारावर प्रकाशाचा, निराशेवर आशेचा आणि वाईटावर चांगल्याचा विजय साजरा करणारा हा सण. मात्र यंदा दिवाळीच्या प्रकाशामागे अनेक प्रश्नांचे गडद सावट उभे आहे. एका बाजूला बाजारपेठांमध्ये रोषणाई आणि खरेदीचा उत्साह दिसत असताना दुसऱ्या बाजूला शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या जीवनात चिंतेचा अंधार कायम आहे. त्यामुळे यंदाची दिवाळी केवळ आनंदोत्सव न राहता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचे चिंतन करण्याची संधी ठरावी.यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाने मोठी ओढ दिली. पावसाच्या अनियमिततेमुळे खरीप हंगामाचे गणित कोलमडले. अनेक भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. शेतीला पाणी नाहीच, पण जनावरांची तहान भागविण्यासाठीही शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागत आहे. जनावरांसाठी चारा उपलब्ध नसल्याने अनेक शेतकरी आपली जनावरे कवडीमोल भावाने विकण्यास मजबूर झाले आहेत. शेतकऱ्यांच्या दारात असलेली जनावरे ही त्यांच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असतात. ती विकण्याची वेळ येणे म्हणजे केवळ आर्थिक नुकसान नव्हे, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणाच मोडण्यासारखे आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी दिवाळी साजरी करायची तरी कशी, हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. दुष्काळाचे संकट केवळ शेतीपुरते मर्यादित राहत नाही. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसला की ग्रामीण बाजारपेठेतील उलाढाल मंदावते. शेतमजुरांना काम मिळत नाही, छोट्या व्यावसायिकांची विक्री घटते आणि त्याचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. बाजारपेठेत ठणठणाट असल्याचे चित्र रंगवले जात असले तरी वाहन खरेदी, चैनीच्या वस्तू आणि महागड्या उत्पादनांच्या विक्रीत मोठी उलाढाल होताना दिसते. मात्र या खरेदीचा उत्साह समाजातील प्रत्येक घटकाच्या आर्थिक सुबत्तेचे निदर्शक मानता येणार नाही. काहींच्या हातात मुबलक पैसा असताना बहुसंख्य कष्टकरी वर्गाला सण साजरा करण्यासाठीही आर्थिक तडजोड करावी लागत असेल, तर विकासाच्या दाव्यांकडे पुन्हा एकदा पाहण्याची गरज आहे. दिवाळीच्या या वातावरणात देशातील शैक्षणिक आणि राजकीय परिस्थितीही चिंताजनक आहे. नीट आणि एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीच्या आरोपांमुळे विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला. वर्षानुवर्षे अभ्यास करून भविष्य घडविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागते, ही शिक्षणव्यवस्थेसाठी लाजिरवाणी बाब आहे. परीक्षा पारदर्शकपणे घेणे आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याची हमी देणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. गुणवत्तेपेक्षा गैरप्रकारांना महत्त्व मिळत असेल, तर तरुण पिढीचा व्यवस्थेवरील विश्वास कसा टिकणार? दुसरीकडे मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्द्यावरून विरोधी पक्ष रस्त्यावर उतरले आहेत. लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक या दोघांचीही भूमिका महत्त्वाची असते. सत्ताधाऱ्यांनी जनतेचे प्रश्न सोडवायचे, विरोधकांनी जनतेच्या वतीने प्रश्न उपस्थित करायचे आणि सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवायचे, ही लोकशाहीची सर्वसाधारण कार्यपद्धती आहे. मात्र आज चित्र काहीसे उलटे दिसत आहे. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी सत्ताधारी पक्षातील नेत्यांनाही मोर्चे काढावे लागत असल्याचे चित्र समोर येत आहे. सत्ता हातात असताना लोकशाही वाचवा, संविधान वाचवा असे म्हणत रस्त्यावर उतरण्याची वेळ येत असेल, तर या राजकीय परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे. लोकशाहीचे रक्षण ही केवळ घोषणांची बाब नाही; ती सत्ताधाऱ्यांच्या कृतीतून सिद्ध व्हायला हवी. संविधानाचे संरक्षण करण्याची सर्वाधिक जबाबदारी सत्तेत असणाऱ्यांवरच असते. राजकारणातील आरोप-प्रत्यारोप, आंदोलनांचे सत्र आणि सत्तासंघर्ष सुरू असताना सामान्य माणसाचे प्रश्न मात्र दुर्लक्षित होऊ नयेत. शेतकऱ्याला पाणी, जनावरांना चारा, विद्यार्थ्यांना पारदर्शक परीक्षा, तरुणांना रोजगार आणि सामान्य नागरिकांना महागाईतून दिलासा हवा आहे. या मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधण्याऐवजी राजकीय पक्ष एकमेकांवर कुरघोडी करण्यातच धन्यता मानत असतील, तर लोकशाहीचा खरा अर्थ हरवण्याची भीती आहे. दिवाळीचा सण हा अंधार दूर करून प्रकाश निर्माण करण्याचा संदेश देतो. परंतु घराघरांत दिवे लावण्याबरोबरच समाजातील निराशा, विषमता आणि अन्यायाचा अंधार दूर करणेही तितकेच आवश्यक आहे. बाजारपेठेतील रोषणाई ही समृद्धीची खरी कसोटी नाही. शेतकऱ्याच्या घरात चूल पेटते का, विद्यार्थ्याला न्याय मिळतो का, कष्टकऱ्याच्या हाताला काम मिळते का आणि सामान्य माणसाच्या आयुष्यात सुरक्षिततेची भावना निर्माण होते का, हेच खरे विकासाचे मापदंड आहेत. यंदाच्या दिवाळीत फटाक्यांचा आवाज काही काळासाठी आसमंत दुमदुमवेल, पण शेतकऱ्याच्या व्यथा, विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि लोकशाहीपुढील आव्हाने त्या आवाजात दडपली जाऊ नयेत. दिव्यांची आरास करताना समाजातील शेवटच्या माणसाच्या आयुष्यातही प्रकाश पोहोचतो आहे का, याचा विचार झाला पाहिजे. कारण दिवाळीचा खरा आनंद हा केवळ स्वतःच्या घरातील रोषणाईत नसतो, तर शेजाऱ्याच्या घरातील अंधार दूर करण्यात असतो. यंदाच्या दिवाळीने हाच सामाजिक भानाचा आणि माणुसकीचा प्रकाश प्रत्येकाच्या मनात जागवावा, हीच अपेक्षा!



आनंददारी दिवाळी...

दिवाळी...दिवाळी सण येत असल्यास आपल्याला आनंद वाटतो. त्यातच दिवाळीचा येणार असलेला आनंद आपण शब्दात व्यक्त करु शकत नाही. दिवाळी ही सर्वांनाच आवडत असते.दिवाळी ही लहान मुलांसाठी जास्त आनंददायी ठरते. त्याचं कारण सुट्ट्या. लहान मुलं ही शाळेत जात असतात. सतत अभ्यास असतो त्यांना. त्यातच परीक्षा वैगेरे. त्या सर्वांचा वीट आलेला असतो. अशातच दिवाळी जेव्हा येते. तेव्हा असलेल्या सुट्ट्या पाहून त्यांना आनंद वाटत असतो. शिवाय त्यांना नवनवीन प्रकारचे कपडेही मिळत असतात. अन् घरी जे नाश्त्याचे पदार्थ दिवाळीनिमित्त बनवले जातात. ते पदार्थही खायला मिळत असतात.

– अंकुश शिंगाडे,
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

दिवाळी ही तरुणांनाही आवडत असते. कारण तरुण मुलेही महाविद्यालयात शिक्षण घेत असतात. त्यातच त्यांनाही या काळात सुट्ट्याच असतात. त्यातच सुट्ट्या असल्यानं कुठं फिरायलाही जाता येत असतं. दिवाळी हा सण कामगारांनाही आवडत असतो. कारण त्यांना बोनस मिळत असतो. ज्यातून आवश्यक कामं पुर्ण होत असतात. दिवाळी जशी सर्वांना आनंददायी वाटते. तशीच ती गृहिणींनाही आनंददायक वाटते. त्याचं कारण आहे, त्यांना मिळणारे कपडे. पतीदेव आपल्या पत्नीला चांगले भरजरी कपडे घेवून देतात. कधी धनत्रयोदयीच्या दिवशी सोन्याचे अलंकारही घेवून देत असतात. तशाच त्या गृहिणी भाऊबीजेच्या दिवशी भावाच्या घरी अक्षीद लावण्यासाठी जातात. ज्यातून माहेराच्या लोकांना भेटता येतं. आपलं सुख दुःख सांगता येत असतं. तसेच त्यांना नवीन नवीन साड्या मिळत असतात. दिवाळी ही खवय्या लोकांसाठीही आनंददायी आहे. नाश्त्यानिमित्त दिवाळीच्या दिवसात अनेक पदार्थ बनवले जातात. ज्यातून दररोज खमंग स्वरुपाचा नाश्त्याचा आश्वाद घेता येतो. दिवाळी हा सण पशुपक्षांनाही आनंददायी ठरतो. हा लक्ष्मीपुजनाचा महिना असल्यानं या काळात जीवहत्या घडत नाही. तसंच बलीप्रतिपदेच्या दिवशी गाईची पुजा केली जाते. याच काळात शिकार करण्यासाठीही मानसिक पाबंदी असते. असा हा आनंदायी सण हा चार पाच दिवसाचा असतो. दिवाळी ही धनत्रयोदशीपासून सुरु होते. धनत्रयोदशी म्हणजे धनाचा पाऊस पडणे वा पडायला सुरुवात होते. धनत्रयोदशी किंवा धनतेरस हा दिवाळीचा पहिला दिवस आहे. जो नेपाळ आणि भारतात साजरा केला जातो. धनत्रयोदशी ही आश्विन महिन्याच्या तेराव्या दिवशी असते. यादिवशी धन्वंतरी पूजन केले जाते. हिंदू परंपरेनुसार आरोग्याची देवता धन्वंतरी, समुद्र मंथनाच्या वेळी प्रकट झाले. ही देवता चतुर्भुज असून याच्या हातात, क्रमशः शंख, चक्र, अमृताचा कलश आणि जळू असतो. तो देवांचा वैद्य मानला जातो. धन्वंतरी हा विष्णूचा अवतार देखील मानला जातो.

धनत्रयोदशी या सणामागे एक प्रचलित कथा आहे. इंद्राने जेव्हा असुरांना बरोबर घेऊन समुद्रमंथन केले, तेव्हा त्यातून चौदा रत्ने प्रगट झाली, त्यापैकी एक धन्वंतरी देवता आहे. म्हणून या दिवसास धन्वंतरी जयंती असेही म्हणतात. यामुळे यादिवशी प्रामुख्याने धन्वंतरीपूजन केले जाते. याच सोबत अजून एक कथा अशी सांगितली जाते की कथित भविष्यवाणी प्रमाणे हेमा राजाचा पुत्र आपल्या सोळाव्या वर्षी मृत्युमुखी पडणार असतो. आपल्या पुत्राने जीवनाची सर्व सुख उपभोगावीत म्हणून राजा व राणी त्याचे लग्न करतात. लग्नानंतर चवथा दिवस हा तो मृत्युमुखी पडण्याचा भयंकर दिवस असतो. या रात्री त्याची पत्नी त्यास झोपू देत नाही. त्याच्या अवतीभवती सोन्या चांदीच्या मोहरा ठेवल्या जातात. महालाचे प्रवेशद्वार ही असेच सोन्या चांदीने भरून रोखले जाते. सर्व महालात मोठमोठ्या दिव्यांनी लखलखीत प्रकाश केला जातो. ती त्यास वेगवेगळी गाणी व गोष्टी सांगून जागे ठेवते. जेव्हा यम राजकुमाराच्या खोलीत सर्परूपात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याचे डोळे सोन्या चांदीने दिपतात. या कारणास्तव यम आपल्या जगात अर्थात यमलोकात परततो. अशा प्रकारे तिने राजकुमाराचे प्राण वाचवले. म्हणूनच या दिवसास 'यमदीपदान' असेही म्हणतात. या दिवशी सायंकाळी घराबाहेर दिवा लावून त्याच्या वातीचे टोक दक्षिण दिशेस करतात. त्यानंतर त्या दिव्यास नमस्कार करतात. याने अपमृत्यू टळतो असा समज आहे.

दुसरा सण म्हणजे नरकचतुर्दशी. नरक चतुर्दशी हा दिवाळीच्या सणातील महत्त्वाचा दुसरा दिवस आहे, ज्याला 'छोटी दिवाळी' किंवा 'रूप चतुर्दशी' असेही म्हणतात. हा सण आश्विन किंवा कार्तिक कृष्ण पक्षातील चतुर्दशीला साजरा केला जातो. या दिवसाचा संबंध हा नरकासुराशी जोडला जातो.नरकासुर हा प्राग्ज्योतिषपूर म्हणजे सध्याच्या आसामचा अत्याचारी राजा होता. त्याने देव, महर्षी आणि सामान्य लोकांना प्रचंड त्रास दिला होता आणि तब्बल १६,१०० स्त्रियांना म्हणजेच राजकन्यांना बंधनात ठेवले होते. काही आख्यायिकांनुसार भगवान श्रीकृष्णाने सत्यभामेच्या मदतीने या नरकासुराचा वध करून प्रजेला आणि त्या सर्व स्त्रियांना त्याच्या बंधनातून मुक्त केले. मरताना नरकासुराने श्रीकृष्णाकडे वर मागितला की, ''जो कोण या तिथीला सुर्योदयापूर्वी स्नान करेल, त्याला नरक यातना होऊ नयेत.'' तेव्हापासून ही परंपरा सुरु झाली. या दिवशी अभ्यंगस्नानाला अतिशय महत्व आहे. नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी ब्रह्ममुहूर्तावर सुवासिक तेल आणि उटणे लावून स्नान करण्याची पद्धत आहे. तसेच या दिवशी कारीट फोडण्याचीही प्रथा आहे. अभ्यंगस्नानापूर्वी पायाने कडवट असलेले 'कारीट' हे फळ फोडले जाते, जे नरकासुराचा वध व वाईटावर मिळवलेल्या विजयाचे प्रतीक मानले जाते. याच दिवशी मृत्यूचे देवता यमराज यांच्या कृपेने अकाली मृत्यू टाळण्यासाठी संध्याकाळी दक्षीण दिशेला किंवा घराबाहेर दिवा लावला जातो. तसेच संध्याकाळी घरासमोर, दारात आणि दुकानांमध्ये पणत्या व दिवे लावून प्रकाशोत्सव साजरा केला जातो.

दिवाळीचा तिसरा दिवस म्हणजे लक्ष्मीपुजन. हिंदू धर्मात लक्ष्मीपूजन हा दिवाळी सणातील सर्वात महत्त्वाचा दिवस मानला जातो. आश्विन अमावास्येच्या संध्याकाळी प्रदोष काळात घरात



सुख, समृद्धी, संपत्ती आणि शांतीसाठी देवी लक्ष्मी, भगवान गणेश आणि कुबेर यांचे पूजन केले जाते. पौराणिक मान्यतांनुसार प्रदोष कालावधीत लक्ष्मीची पूजा करणे अत्यंत शुभ मानले जाते. यावेळेस मूर्ती किंवा लक्ष्मीच्या चित्रांचं, लक्ष्मी आणि गणपतीची मूर्ती किंवा फोटो वापरुन पूजन केलं जातं. यात लक्ष्मीच्या उजव्या बाजूला गणपती ठेवावा लागतो. तसेच इतर देवात विशेषतः कुबेर, श्रीयंत्र किंवा शंख ठेवलं जातं. यावेळेस हळद, कुंकू, अक्षता, चांदणे, अखंड तांदूळ, हार-फुले, सुपारी, पान, अगरबत्ती, दिवा तूप किंवा तेल वापरुन, तसेच कापूर या वस्तूने पूजन केलं जातं. एवढंच नाही तर विशेष वस्तू म्हणून नवीन केरसुणी अर्थात झाडू, वह्या-लेखणी, व्यापाऱ्यांसाठी, चलनी नोटा, नाणी आणि सोन्याचे, चांदीचे दागिने ठेवले जाते. याशिवाय तांब्याचे किंवा मातीचे भांडे, कलश म्हणून वापरलं जाते. ज्यामध्ये गंगाजल, आंब्याची पाने आणि नारळ ठेवला जातो. नैवेद्यात गायीच्या दुधाचा खवा, लवंग, वेलची, साखर घालून बनवलेला, धने, गूळ, साळीच्या लाह्या आणि बत्तासे ठेवले जातात.

दिवाळीच्या दिवशी घर स्वच्छतेला जास्त महत्व आहे. लक्ष्मीपूजनाच्या आधी संपूर्ण घर स्वच्छ करून दारासमोर रांगोळी काढली जाते. या दिवशी केरसुणी पूजन: जुन्या-नव्या केरसुणीची पूजा केली जाते. या दिवशी पूजन करतांना चौरंगावर मांडणी केली जाते. पाटावर किंवा चौरंगावर लाल रंगाचे वस्त्र अंथरून त्यावर अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढावे लागते. त्यावर गणपती व लक्ष्मीची मूर्ती पूर्व किंवा पश्चिम दिशेला तोंड करून ठेवावी लागते. शेजारी कलश स्थापना करावा लागतो. षोडशोपचार पूजा आचमन, दीपपूजन, गंध, अक्षता, फुले वाहून केली जाते. लक्ष्मी मातेचे ध्यान करताना मंत्राचा जप करावा लागतो. ॐ श्री महालक्ष्म्यै च विद्महे विष्णु पत्न्यै च धीमहि तन्नो लक्ष्मी प्रचोदयात् ॐ हा मंत्र म्हटला जातो. त्यानंतर मनोभावे आरती करून नैवेद्य दाखवावा लागतो.लक्ष्मीपूजन करतांना पूजेच्या वेळी काही नियमही आहेत. घरातील सर्व दरवाजे आणि खिडक्या उघड्या ठेवाव्या लागतात. जेणेकरून माता लक्ष्मीचा प्रवेश घरात सुलभ होतो. पूजेच्या वेळी अखंड दिवा अखंड ज्योत तेवत ठेवावा लागतो. पूजेत वंश किंवा बांबूची अगरबत्ती वापरू नये, असा नियम आहे. टिळक करताना अनामिकेचा वापर करावा लागतो.

दिवाळीचा चौथा दिवस असतो, बलिप्रतीपदा. बलिप्रतिपदा हा सण दिवाळीचा पाडवा म्हणूनही ओळखला जातो. जो कार्तिक शुद्ध प्रतिपदेला साजरा केला जातो. हा दिवस हिंदू पंचांगानुसार साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. या सणाची पौराणिक कथा अशी आहे. असुरराज बळी विरोचनपुत्र आणि प्रह्लाद यांचे नातू. हे अतिशय दानशूर, विनयशील आणि प्रजावत्सल राजा होते. त्यांच्या या दानशूरतेची परीक्षा घेण्यासाठी आणि देवांचे राज्य सुरक्षीत ठेवण्यासाठी भगवान श्रीविष्णूने वामनावतार धारण केला. वामन बटूने बळीराजाकडे तीन पाऊल भूमी मागितली. बळीने संमती दिल्यानंतर वामनाने विराट रूप धारण करून पहिल्या दोन पावलांत पृथ्वी आणि स्वर्ग व्यापला आणि तिसरे पाऊल बळीराजाच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळात पाठवले. बळीराजाच्या दानशूरपणावर प्रसन्न होऊन विष्णूंनी त्याला पाताळचे राज्य दिले आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा दिवस पृथ्वीवर 'बळीराज्य' म्हणून साजरा होईल असा वर दिला. तेव्हापासून बलिप्रतिपदा साजरी केली जाते. या दिवशीची परंपरा आहे. इडा, पीडा टळो व बळीचं राज्य येवो. या दिवशी लोक पाटावर किंवा जमिनीवर पंचरंगी रांगोळीने किंवा शेणाने बळीराजाची प्रतिमा काढून त्याची पूजा करतात आणि ''इडा पीडा टळो, बळीचे राज्य येवो'' अशी प्रार्थना करतात. महाराष्ट्रात सुवासिनी स्त्रिया आपल्या पतीला ओवाळतात अर्थात औक्षण करतात आणि पती पत्नीला भेटवस्तू देतो. नवविवाहितांची पहिली दिवाळी बहुधा माहेरी साजरी करण्याची पद्धत आहे. तसेच व्यापारी लोकँ हा दिवस नवीन वर्षाची सुरुवात म्हणून मानतात. व्यापारी नवीन जमा-खर्चाच्या वह्यांचे पूजन करून नव्या आर्थिक वर्षाचा प्रारंभ याच दिवशी करतात. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे या दिवशी सोने, चांदी किंवा नवीन वस्तूंची खरेदी शुभ मानली जाते.

बलिप्रतीपदेला एक ग्रामीण व आदिवाशी परंपराही लाभली आहे. ग्रामीण भागात शेतकरी बांधव शेताच्या शिवेवर दिवा लावून मडके पुरतात. आदिवासी समाजात गुरं-ढोरांची पूजा करून 'ढोर उठवणे' हा विधी केला जातो.दिवाळीचा पाचवा दिवस म्हणजे भाऊबीज. ज्याची माहिती सर्वांनाच आहे. भाऊबीज हा भाऊ आणि बहिणीच्या पवित्र प्रेमाचा व नात्याचा सण आहे. हा दिवाळीचा शेवटचा सण मानला जातो. या सणाला कार्तिक शुद्ध द्वितीया अर्थात 'यमद्वितीया' असेही म्हणतात. हा सण दिवाळीच्या सणानंतर किंवा दिवाळीतील सहाव्या दिवशी येतो. या दिवशी यमराज आपली बहीण यमी अर्थात यमुना हिच्या घरी जेवायला गेले होते. यमुनाने आपल्या भावाचा आदरसत्कार करुन त्याला जेवण घातले. तेव्हा यमराजाने तिला वर मागण्यास सांगितले, तेव्हा यमुनेने मागितले की, ''आजच्या दिवशी जी बहीण आपल्या भावाला ओवाळेल, त्याला यमभय असू नये.'' तेव्हापासून ही परंपरा सुरु झाली. या दिवसाला यमद्वितीया असेही म्हणतात. या दिवशी बहीण आपल्या भावाला किंवा भाऊ बहिणीच्या घरी जाऊन गोडधोड भोजन करतो. बहीण आपल्या भावाला टिळक लावते. दिवा, हळद-कुंकू लावून ओवाळते. भाऊ आपल्या बहिणीला प्रेमाने भेटवस्तू किंवा ओवाळणीत पैसे, वस्त्रे इत्यादी देतो. सायंकाळी चंद्रकोर दिसल्यानंतर बहीण चंद्राची आणि भावाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. भाऊ नसल्यास चांदोबाला ओवाळण्याची पद्धत आहे.

असा हा पाच दिवसाचा आनंदाचा आनंददायी दिवाळीचा सण आपल्या देशात अगदी थाटामाटात साजरा केला जातो. अगदी वाद्याच्या गजरात साजरा होतो. फटाकेदेखील फोडले जातात या सणाला. मातीचे व तेलाचे दिवे लावले जातात. अलिकडील काळात रोशनाईसाठी इलेक्ट्रिक स्वरुपाची लाईटिंगही निघालेली आहे. आख्यायिका आहे की या दिवशी रोशनाईचा झगमगाट केल्यास वा फटाके फोडल्यास वा दिवे लावल्यास लक्ष्मी चालून घरी येते. ती वर्षभर टिकते. परंतु काही गालबोटही या सणानिमित्त लागतं. ते गालबोट म्हणजे फटाके फोडतांना न घेतलेली काळजी. ज्यातून अपघात होतो व शरीराचे अवयव नष्ट होवू शकतात. डीजे व फटाक्याच्या प्रचंड आवाजाने ध्वनी प्रदूषण होतं. ज्यात कान निकामी होवू शकतात. तसेच घराच्या भिंतींनाही तडा जात असतो. महत्वाचं सांगायचं झाल्यास दिवाळी हा आनंदाचा सण आहे. आनंददायी सण आहे. तेव्हा हा सण साजरा करतांना आनंदानंच साजरा करावा. कोणाला त्रास देवू नये. फटाके फोडावे. परंतु काळजी घेत फोडावेत. डीजे वाजवावे. परंतु ते तेवढ्या तीव्रतेने वाजवू नये की जेणेकरुन भिंतींना तडा जाईल. लोकांचे कान बहिरे होतील. म्हाताऱ्यांना त्रास होईल. पशूपक्ष्यांनाही त्रास होईल. कोणालाही त्रास होणार नाही. अशीच आनंदाची आनंददायी दिवाळी आपण साजरी करावी. हे तेवढंच खरं...

श्रेयनामावली
मुख्य संपादक : प्रदीप अनंतराव नागापूरकर,
सहसंपादक : अविनाश पंढरीनाथ पाटील
विशेष सहकार्य : संजय लष्करे, नागेश डोंगरे, एन.टी.कांबळे केशव नवरे.
जाहिरात संकलन : बी.एल. कागणे (किनवट), सरफराज दोसाणी (माहूर), बी.आर.पांचाळ (भोकर), शेख चांद पाशा (हदगाव), नरसिंग अन्नमवार (देगलूर), दिगांबर वाघमारे (कंधार), संजय झगडे (धर्माबाद), गणेश कंदुरके (नायगाव), वैशपाल कांबळे (मांडवी), शंकर कोंडावार (कुंडलवाडी) जयराम वने (मुदखेड), त्रिरत्न सवई (उमरी).
मांडणी व सजावट : लहु राठोड (नांदेड)






सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४

मास्तर... छी थू व्हतीयं, त्याचं करायचं काय?

कॉ. प्रवीण मस्तूद,
बारशी
मो. ९९६०३१२९६३



भुसणाळ्या–अयं मास्तर! कसं काय चाललंय?

मास्तर–का रे भुसणाळ्या! अहो मास्तर वरून आज थेट अयं मास्तर वर आलास? काय रे, आदराची बाराखडी विसरला काय?

भुसणाळ्या–न्हाई मास्तर! बाराखडी अजून लक्षात हाय. पण आज आदर मात्र जिभेवर येईना!

मास्तर–का रे बाबा? कालपर्यंत तर माझ्या पाया पडायचास. आज अचानक एवढा काय बदल झाला?

भुसणाळ्या–कालपर्यंत तुमच्याबद्दल लई आदर होता

मास्तर! वाटायचं, तुम्ही आम्हाला शहाणपण शिकवता. चांगलं–वाईट समजावता. निती–अनिती, बरं–वाईट शिकवता, न्यायाचं–अन्यायचं सारं सारं शिकवला...नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान अनं प्रेरणा देणारा इतिहास शिकवता...लोकशाही म्हणजे काय, मतदानाचं महत्त्व काय, मत विकणं म्हणजे लोकशाहीचा अपमान कसा, स्वाभीमान महत्वाचा, लबाडी चांगली नव्हं...हे सगळं तुमच्याच तोंडून ऐकलंय आम्ही!

मास्तर–मग? त्यात चुकलं कुठं?

भुसणाळ्या–चुकलं तुमचं न्हाई मास्तर, आमचंच चुकलं! आम्ही तुमचं शिकवणं खरं समजलो. तुम्ही मात्र शिकवता एक आणि करताना दुसरंच!

मास्तर–आरे, नीट बोल! काय झालंय ते तरी सांग.

भुसणाळ्या–आवं मास्तर, तुमचा रेट निघाला म्हणत्यात!

मास्तर–(दचकून) काय? आमचा रेट? तुला रे कोण म्हणालं?

भुसणाळ्या–म्हणणारा कोण हाय, वाटणारे माझेच दोस्त हायती! माझे दोस्त कसले खतरूड तुम्हासनी माहिती नाही व्हयं (दात इचकून) त्यांनीच सांगितलं. म्हणलं, मास्तर तर वर्गात पैशासाठी मत विकणाऱ्यांना लोकशाहीचे शत्रू म्हणतात. मग हे पाकीट यांच्या हातात कसं काय?

मास्तर–बरं! म्हणजे तो तुझा दोस्त होय? हल्ली सगळेच उगाच अफवा पसरवतात.

भुसणाळ्या–अफवा न्हाई मास्तर! गावात समदीकडं चर्चा हाय. तुमास्नी माहीत न्हाई व्हय? तुमी आमचे मास्तर असाल; पण गावात आम्ही मास्तर !

मास्तर–(सावरत) माहिती हाय मला. मी तुला आजकाल ओळखतोय काय? तू माझाच विद्यार्थी हायस. पण प्रत्येक गोष्टीमागं काहीतरी परिस्थिती असते.

भुसणाळ्या–परिस्थिती? वा मास्तर वा! आम्ही गरिबीमुळं पैशासाठी मत विकलं तर भ्रष्टाचार; अन् तुम्ही विकलं तर परिस्थिती? आमचं पाकीट काळं अन् तुमचं पाकीट गोरं?

मास्तर–अरे, तसं नाही रे! माणसाच्या आयुष्यात अनेक अडचणी असतात. बाहेरून दिसतं तसं आतून नसतं.

भुसणाळ्या–व्हय राव मास्तर! हे मात्र खरं हाय. बाहेरून माणूस कितीही चांगला वाटला, तरी निवडणूकीत पाकिट हाणननारंच...! बरं तिबी शिक्षक अनं पदवीधराच्या शहाण्या समजल्या जाणऱ्या निवडणूकीत...! अवघड हाय बा ीी...!

मास्तर–जरा जीभ सांभाळून बोल! शिक्षक आहे मी तुझा.

भुसणाळ्या–म्हणून तर जपून बोलतोय मास्तर! दुसरा कोणी असता तर नावानं हाक मारली असती. तुमाला तर अजूनबी मास्तर म्हणतोय. तुमच्या शिकवण्याचा मान ठेवतोय. पण तुम्हीच त्या शिकवण्याचा बाजार मांडलात तर आम्ही कोणाकडं बघायचं? तुम्ही शहाणे म्हणून तुम्हासनी आमच्या परीस दोन मतं जास्त...! अनं त्याचा रेट बी बराचं मोठा राव...! आजवर मास्तर मास्तरकीच्या निवडणूकीसाठी पैसा घेतलेलं ऐकीवात नव्हतं राव...!

मास्तर–बरं, तुला काय वाटतं? शिक्षकांना अडचणी नसतात?

भुसणाळ्या–असतात की मास्तर! आमच्यापेक्षा जास्तच असतील कदाचित. पण एक सांगा, तुमच्या अडचणी किती रुपयाला सुटल्या?

मास्तर–(चिडून) अरे, तू प्रत्येक गोष्टीत पैसाच का आणतोस?

भुसणाळ्या–कारण मास्तर, या निवडणुकीत दुसरं काय दिसलं? भाषणात विकास, जाहीरनाम्यात लोककल्याण, व्यासपीठावर लोकशाही अन् पडद्यामागं नोटांची बंडलं! मतदाराला मास्तराला नागरिक समजायचं की विक्रीला काढलेला माल?

मास्तर–अरे, लोकशाहीत प्रत्येकाला आपला निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य आहे. तसं आम्हालाही आहे.

भुसणाळ्या–अगदी खरं! पण मास्तर, निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य अन् निर्णय विकण्याचा बाजार यात फरक हाय की न्हाई? मत देणं हा अधिकार हाय; तो नोटांच्या बदल्यात देणं म्हणजे अधिकाराचा लिलाव न्हाई का?

मास्तर–तू फारच तत्त्वज्ञान शिकून आलायस आज!

भुसणाळ्या–तुमच्याच वर्गात बसून शिकलोय मास्तर! तुम्हीच सांगायचात, लोकशाहीत मतदार हा राजा असतो. धर्माधर्मात भांडण लावणारे आपल्या पोळीवर तूप ओढतात, लबाडांना लबाडांची जागा दाखवावी, मताची किंमत अमूल्य आहे, आपला स्वाभिमान धान ठेऊ नये, पण आता समजलं, निवडणुकीच्या काळात राजा नसतो; तो पाचशे–हजाराच्या नोटेवर सह्या करणारा तात्पुरता ग्राहक असतो! अनं तुम्ही तर दहा पंधरा हजारांपस्तोर पोहचलाव...!

मास्तर–(खाकरत) बरं, पण मला काय वाटलं ते सांगतो. फार भुसणाळ्या–मग आमचं जमा झालं न्हाई, आम्ही बसलो अकाउंटला वाट बघत. अन् तुम्ही मात्र नंबर हाणला मागनं! तुमचं काय मास्तर, तुम्ही तर लय हुशार!

मास्तर–अरे, मी तुझा शिक्षक आहे. तुझ्यापेक्षा हुशार असणारच!

भुसणाळ्या–हे मात्र शंभर टक्के खरं!

मास्तर–मग उगाच शिक्षक झालो का मी? हुशारी असल्याशिवाय माणूस शिक्षक होतो काय?

भुसणाळ्या–तुमची हुशारी मात्र फार खच्चेड हाय मास्तर! आम्हाला लोकशाही शिकवताना सांगायचं, मतदान हा पवित्र अधिकार आहे; तो विकू नका! अन् स्वतः मतदानाच्या दिवशी अधिकाराचं पाकीट करून खिशात घालायचं! ही हुशारी आम्हाला जमली न्हाई बघा! तरी आम्ही म्हणताय आम्ही गरीब, कामगार, शेतकरी रत्यावर लढत असतात आमच्या सोबत अडचणी आहेत रे माझ्याही समोर!

भुसणाळ्या–व्हय राव मास्तर! दुष्काळबी पडलाय या वर्षी. आमचं अजून जमा झालं न्हाई ५ हजार. पोरांना दिवाळीला कानवले करून द्यायाचं राहिल्यात. घरात किराणा संपलाय. खताचं बिल बाकी हाय. बँकेचा हप्ता डोक्यावर हाय. आम्ही अकाउंटला सरकारी महतीची बसलाव वाट बघतं.

मास्तर–मग तुम्हाला मदत मिळाली तर घेता ना?

भुसणाळ्या–गरिबाला मदत मिळाली तर तो जगतो मास्तर! पण मतदानाच्या बदल्यात पैसे घेऊन आपण आपला आवाजच गहाण टाकला, तर उद्या त्याच गरिबाच्या हक्कासाठी कोण बोलणार? मदत अन् मताची किंमत यात फरक हाय की न्हाई? तुम्हासनी लाखाचा पगार तिकडं आमचे मित्र सीएचबी वरं हजारावर मरत्यात...! तुम्हासनी शेतीबाडी... ती बी बागायत...!

मास्तर–थोडे नरम पडत) हं... तेही खरंच आहे म्हणा.

येत नाही. आता कळलं बुडाखाली आंधार असलेलं कशाला येईल सरकार विरोधात बोंबलायला. तुमच्या तोंडात तोबरा गच्च भरलाय... बोलताना खाली पडलं की; म्हणून तर बोलत नाही तुम्ही काही सा ! तुमचा मुडदा पाडला राव सत्ताधीशांनी मास्तर...!

मास्तर–(चेहरा उतरवत) अरे, तू उगाच माझ्या मागं लागलायस. मी काही एकटा नाही. कितीतरी लोकांनी पैसे हानलेत.

भुसणाळ्या–मास्तर, हीच तर खरी गंमत हाय! वर्गात एखाद्या पोरानं कॉपी केली, तर तुम्ही त्याला म्हणता, दुसऱ्यानं केलं म्हणून तू केलंस तर ते बरोबर होतं का? मग आता कितीतरी लोकांनी पैसे घेतले म्हणून तुमचं कृत्य बरोबर कसं झालं?

मास्तर–(निरुत्तर होत) तुझ्या तोंडाला कोण लागणार रे!

भुसणाळ्या–तोंडाला लागायचं न्हाई मास्तर, फक्त आरसा दाखवायचा हाय! तुम्ही रोज वर्गात आम्हाला सत्य, प्रामाणिकपणा, कर्तव्य अन् नैतिकता शिकवता. पण स्वतःच त्या मूल्यांना सुट्टी दिली तर पोरांनी पुस्तकातलं शिकायचं की तुमच्याकडून?

मास्तर–बरं बाबा, मान्य आहे की काही गोष्टी चुकीच्या असू शकतात. पण माणसाला स्वतःच्या संसाराचाही विचार करावा लागतो.

भुसणाळ्या–संसाराचा विचार करायचा न्हाई असं कोण म्हणतंय? पण मास्तर, तुमचा संसार चालावा म्हणून लोकशाहीचा संसार मोडायचा का? तुमच्या पोराच्या शिक्षणासाठी घेतलेले पैसे उद्या त्याच पोराला कोणत्या तोंडानं सांगणार, की बेटा, प्रामाणिकपणे जग?

मास्तर–(गंभीर होत) हं... हे जरा जास्तच झालं.

भुसणाळ्या–जास्त न्हाई मास्तर, नेमकँ हाय! तुमच्या पोराला इंग्लिश मीडियम, आम्हाला सरकारी शाळा; तुमच्या हातात महागडा फोन, आमच्या हातात उधारीची वही; तुमच्या घरी बागायत, आमच्या शेतात दुष्काळ! तरी आम्ही तुमचा आदर करतो. कारण तुम्ही आम्हाला माणूस म्हणून जगायला शिकवाल, अशी अपेक्षा असते.

मास्तर–बरं, आता तूच सांग, मी काय करायला पाहिजे होतं?

भुसणाळ्या–मास्तर, तुमच्या अडचणी होत्या ना? मग तुम्ही त्या अडचणींशी लढायचं होतं. चुकीच्या पैशाला नकार द्यायचा होता. तुमच्यासारखा शिकलेला माणूसच पैशाला बळी पडला तर अशिक्षित माणसानं कोणाकडून शिकायचं?

मास्तर–म्हणजे तुझ्या मते पैसे घेऊन मतदान करणं चुकीचंच?

भुसणाळ्या–मास्तर, मत कुणाला द्यायचं हा प्रत्येकाचा निर्णय. पण पैसे घेऊन मत विकत घेणारा उमेदवार अन् पैसे घेऊन मत विकणारा मतदार, दोघंही लोकशाहीच्या विश्वासाला तडा देतात. मताची किंमत नोटेत न्हाई, तर त्या मतानं ठरणाऱ्या पाच वर्षांच्या भविष्यात असते!

मास्तर–(काहीसा बचाव करत) बरं, समजा मी चूक केली. पण आता त्याचं करायचं काय?

भुसणाळ्या–काय करायचं? पहिल्यांदा स्वतःची चूक मान्य करा. दुसऱ्यांदा पोरांना शिकवताना पुस्तकातलं तत्त्व स्वतःच्या वागण्यात आणा. तिसऱ्यांदा गावात उभं राहून सांगा, मत विकणं चूक आहे, मग तो गरीब असो की श्रीमंत, अशिक्षित असो की मास्तर!

मास्तर–(खाली मान घालून) भुसणाळ्या, तू आज माझा चांगलाच वर्ग घेतलास!

भुसणाळ्या–आवं मास्तर, वर्ग तर तुम्ही रोज घेता. आज फक्त विद्यार्थ्यानं शिक्षकाला दोन धडे दिलेत!

मास्तर–कोणते दोन धडे?

भुसणाळ्या–पहिला धडा, लोकशाहीत मत विकू नये.

मास्तर–अन् दुसरा?

भुसणाळ्या–लोकशाही शिकवणाऱ्यानं स्वतःची मतं आधी विकू नयेत!

मास्तर–(हसण्याचा प्रयत्न करत) बरं, बरं! आता घरी जा. फार उशीर झालाय.

भुसणाळ्या–जातो मास्तर! पण एक शेवटचं विचारतो. तुम्ही वर्गात आम्हाला सांगायचात ना, देशाचं भविष्य तरुणांच्या हातात असतं.

मास्तर–हो, सांगायचो!

भुसणाळ्या–मग मास्तर, त्या भविष्याला घडवणारे शिक्षकच जर वर्तमानात पैशाच्या मागं लागले, तर भविष्य घडणार कसं? इथून पूढं बाटू नका... लोकशाही नासवू नकासा !

मास्तर–(निरुत्तर...)

भुसणाळ्या–चला मास्तर, रामराम! तुमचा आदर अजून पूर्ण संपलेला न्हाई. पण आता तुम्हाला बघितलं की एकच प्रश्न पडतो...

मास्तर–कोणता रे?

भुसणाळ्या–मास्तर...छी थू व्हतीयं, त्याचं करायचं काय?



सर्वांना
दीपावली
च्या
हार्दिक
शुभेच्छा

डॉ.हनुमंत रेड्डे
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

सर्वांना
दीपावली
च्या
हार्दिक
शुभेच्छा

अॅड.पी.एम. कंधारे
भारत सरकार नोटरी
जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड

अॅड.शिवानी जोगदंड
नांदेड

के.रामलू पब्लिक स्कूल इ./मा. कुंडलवाडी ता.बिलोली

कुंडलवाडी व परिसरातल्या
गावातील सर्व विद्यार्थी, शिक्षक,
पालक व सर्व नागरिकांना

दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक -

यशवंत संगमवार
सचिव

साई रेड्डी ठक्कूरवार
अध्यक्ष

सौ.रमा ठक्कूरवार
संचालिका
शुभेच्छुक : के.रामलू पब्लिक स्कूल इ./मा.कुंडलवाडी

"कष्टाच्या शेतात
समृद्धीचे पीक पिको,
इडा-पिडा टळू दे,
बळीराज्याचे राज्य येवो!"
सर्व जनतेस
दीपावली
निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
गंगाधर रुद्रुरकर (सर)
कुंडलवाडी ता.बिलोली

शुभ
दिपावली
सर्व ग्राहकांना दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा...!
कदम
ज्वेलर्स
सोने व चांदीचे
भव्य शोरुम
सराफा लेन, मुदखेड

..... शुभेच्छुक.....
श्री गजानन रामराव पा. कदम

बळीराम पाटील शिक्षण प्रसारक मंडळ मांडवी
तर्फे
दिवाळी निमित्त सर्व
जनतेस हार्दिक शुभेच्छा !
उत्तमराव राठोड विद्यालय कोठारी, सिंद, ता. किनवट
शरदचंद्र पवार विद्यालय, निराळा तांडा, ता. किनवट
- शुभेच्छुक -

मा.गोदाजी चव्हाण
सचिव
बळीराम पाटील शिक्षण प्रसारक मंडळ
मांडवी ता. किनवट

१०० जन्मशताब्दी वर्ष १९२६ - २०२६
यंदाच्या भीषण दुष्काळामुळे महाराष्ट्रातील शेतकरी
बांधवांसह संपूर्ण जनतेला मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे.
या संकटातून महाराष्ट्राला सुखरूप बाहेर काढ,
शेतकरी बांधवांच्या जीवनात सुख-समृद्धीची पहाट आण,
अशी आई तुळजाभवानी चरणी प्रार्थना!
दुःख दूर होवो, आशेचे दीप उजळो, महाराष्ट्र सुखी-समृद्ध होवो..!
दिवाळी
निमित्ताने आपणास
व आपल्या परिवारास
हार्दिक
शुभेच्छा..!

॥ बाबुराव कदम कोहळीकर ॥
॥ आमदार, हदगाव हिमायतनगर विधानसभा मतदारसंघ ॥
॥ सदस्य, सार्वजनिक उपक्रम समिती ॥
॥ सिनेट सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड ॥

सर्व जनतेस
दीपावली
निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
व्यंकट मुकुंदराव कांबळे
सौ.मिनाक्षी व्यंकटराव कांबळे
नगरसेविका नगर पालिका देगलूर
व कांबळे परिवार देगलुर ता.देगलुर जि.नांदेड


रांगोळीच्या सप्तरंगात सुखाचे दीप उजाडू दे.
लक्ष्मीच्या पावलांनी घर सुख,
समृद्धी ने भरू दे।
दिपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा.!
:: शुभेच्छुक ::
भास्कर भगवानराव भिलवंडे
(प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

शेतकऱ्याच्या आयुष्यात दिवाळीचा प्रकाश कधी येणार?

पान १ वरुन

घरातील महिला फराळाची तयारी करण्याचा विचार करतात. मात्र घरातील कर्त्या पुरुषासमोर पैशांचा प्रश्न उभा असतो.

घरात उत्पन्न नाही, शेतातून उत्पादन नाही, बँकेचे कर्ज आहे आणि सावकाराचा तगादा सुरू आहे. अशा वेळी मुलांना नवीन कपडे कसे घ्यायचे? फराळासाठी साहित्य कसे आणायचे? घरात पणत्या कशा लावायच्या? शहरातील बाजारपेठा रोषणाईने उजळलेल्या असताना ग्रामीण भागातील अनेक घरांमध्ये आर्थिक संकटाचा अंधार आहे. दिवाळीचा दिवा लावण्यासाठी तेल लागते; पण शेतकऱ्याच्या घरात आज तेल विकत घेण्यासाठीही पैसा नाही, ही समाजासाठी चिंतेची बाब आहे.

.....शासनाकडून अपेक्षित असलेल्या उपाययोजना

या परिस्थितीत महाराष्ट्र शासनाने केवळ दुष्काळ जाहीर करून थांबून चालणार नाही. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळेल अशा ठोस उपाययोजना राबविण्याची गरज आहे., नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात पीक नुकसानीची भरपाई म्हणून तातडीची आर्थिक मदत विनाविलंब जमा करावी.,

पीककर्जाबाबत दिलासा: पीककर्जाचे पुनर्गठन करून आवश्यकतेनुसार कर्जवसुलीला स्थगिती आणि व्याजात सवलत द्यावी.

सावकारांच्या त्रासापासून संरक्षण : बेकायदेशीर वसुली करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी.

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था : दुष्काळग्रस्त गावांमध्ये आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा.

जनावरांसाठी चारा: चारा डेपो आणि चारा छावण्या सुरू करून जनावरांना चारा उपलब्ध करून द्यावा.

रोजगाराची उपलब्धता: मनरेगा आणि इतर योजनांद्वारे ग्रामीण भागात रोजगार निर्माण करावा.

विशेष दिवाळी मदत: आर्थिक संकटातील शेतकरी कुटुंबांना विशेष आर्थिक मदत किंवा जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून द्याव्यात.

पीकविमा आणि पंचनामे: पीकविमा दावे आणि नुकसानभरपाईची प्रक्रिया जलद व पारदर्शक करावी.

....समाजाची आणि सामाजिक संस्थांची जबाबदारी

शेतकऱ्यांचे संकट केवळ शासनाने सोडवायचे आहे असे मानून चालणार नाही. सहकारी संस्था, बँका, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, व्यापारी संघटना आणि सेवाभावी संघटनांनीही पुढाकार घेणे आवश्यक आहे.

दिवाळीच्या निमित्ताने गरजू शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गरजू कुटुंबांना धान्य आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याचे उपक्रम राबविता येतील.

शहरातील नागरिकांनीही स्थानिक शेतकरी आणि ग्रामीण कारागिरांकडून उत्पादने खरेदी करून त्यांना आर्थिक आधार द्यावा. दिवाळीचा आनंद स्वतः पुरता मर्यादित न ठेवता तो गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचविणे, हाच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकीचा विचार आहे.

....शेतकरी आत्मसन्मानाने जगला पाहिजे

शेतकरी हा समाजाचा अन्नदाता आहे. ऊन, वारा, पाऊस आणि नैसर्गिक संकटांची पर्वा न करता तो संपूर्ण समाजासाठी अन्नधान्य निर्माण करतो. मात्र दुर्दैवाने अन्न निर्माण करणारा हाच शेतकरी आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करताना दिसतो.

शेतकऱ्याला दया नको, तर न्याय हवा आहे. केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष मदत हवी आहे. त्याच्या कष्टाला योग्य मोबदला मिळाला पाहिजे. पाण्याचे नियोजन, जलसंधारण, ठिबक सिंचन, पीक विविधीकरण आणि शेतीमालाला योग्य भाव या बाबींवर दीर्घकालीन धोरण आखले पाहिजे. आजही शेतीसंबंधी अनेक कायदे कालबाह्य आहेत. यामुळे शेतमालाला योग्य प्रमाणात भाव मिळत नाही. हे कायदे रद्द होणे गरजेचे आहे. शेतकरी जगला तर गाव जगेल, गाव जगले तर बाजारपेठ जगेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली तरच महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट होईल.

शेतकऱ्यांच्या घरातही दिवाळीचा प्रकाश पोहोचू द्या!

दिवाळी हा अंधारावर प्रकाशाचा आणि निराशेवर आशेचा विजय दर्शविणारा सण आहे. मात्र हा प्रकाश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला पाहिजे. शेतकऱ्यांच्या घरात अंधार असेल, तर समाजाच्या दिवाळीचा आनंदही अपूर्ण आहे.

आज गरज आहे ती शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची, त्यांच्या कष्टांचा सन्मान करण्याची आणि त्यांना आर्थिक आधार देण्याची. शासनाने मदतीचा हात पुढे करावा, प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे आणि समाजाने शेतकऱ्यांच्या वेदना समजून घ्याव्यात.शेतकऱ्याच्या घरात दिवाळी साजरी होण्यासाठी त्याच्या हातात पैसा, शेतात पाणी, जनावरांना चारा आणि मनात उद्याच्या दिवसाची आशा असली पाहिजे.

शेतकरी हा केवळ मतदार नाही, तर देशाचा अन्नदाता आहे. तो केवळ लाभार्थी नाही, तर अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या कष्टावर समाजाचे जीवन अवलंबून आहे. म्हणूनच या दिवाळीत आपण एक संकल्प करूया की, शेतकऱ्यांच्या घरातील अंधार दूर करण्यासाठी प्रत्येकजण आपापल्या परीने योगदान देईल.

शहरातील रोषणाईपेक्षा शेतकऱ्याच्या घरातील दिवा महत्त्वाचा आहे. बाजारपेठेतील खरेदीपेक्षा शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरील हास्य महत्त्वाचे आहे. दिवाळीच्या फटाक्यांपेक्षा शेतकऱ्याच्या मनातील आशेची ज्योत अधिक महत्त्वाची आहे.शेतकरी वाचला पाहिजे, शेती टिकली पाहिजे आणि शेतकऱ्यांच्या घरातही आनंदाची दिवाळी साजरी झाली पाहिजे!

जागतिक बँकेकडूनच सरकारी दाव्यांची पोलखोल



दर आठवड्याला दिल्लीतील कोणी ना कोणी मंत्री शेतकऱ्यांना सांगतो की, सगळे आलबेल आहे: विक्रमी पीक, भरपूर खत, इंधनाचे दर नियंत्रणात आणि २०४७ पर्यंत विकसित भारत. पण या सरकारची विरोधक नसलेल्या जागतिक बँकेनेच आता हे दावे खोडून काढले आहेत. बँकेच्या 'दक्षिण आशिया आर्थिक अहवाल' ऑक्टोबर २०२६) मध्ये सरकारच्या विकासदराचे कौतुक केले आहे. तरीही त्याच अहवालातून शेतीवरील खोल संकट आणि बातम्यांच्या मथळ्यांत दाखवली जाते त्यापेक्षा कितीतरी कमकुवत अर्थव्यवस्था समोर येते.

कॉ.राजन क्षीरसागर
अध्यक्ष
अखिल भारतीय किसान सभा
मो.९८६०४८८८६०

सरकारी कागदावर नसलेला दुष्काळ

२९ सप्टेंबर रोजी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान म्हणाले की, दुष्काळ असूनही खरीप उत्पादनात फारशी घट होणार नाही. पावसाने दगा दिलेल्या या वर्षात त्यांच्या मंत्रालयाने खरीप उत्पादनाचे उद्दिष्ट १९.६ कोटी टन ठरवले आहे. हे गेल्या वर्षीच्या प्रत्यक्ष उत्पादनापेक्षा २.२ कोटी टनांनी जास्त आहे.

जागतिक बँक म्हणते की यंदाचा जून ते ऑगस्ट हा काळ १९६० नंतरचा देशातील चौथा सर्वात कोरडा काळ ठरला. यापूर्वी ज्या दोन वर्षांत मान्सून सुमारे २० टक्क्यांनी कमी पडला, त्या वर्षी शेती उत्पादन सामान्य पातळीपेक्षा ४ ते ५ टक्क्यांनी घसरले. बँकेच्या मते यंदा उत्पादन घटेल आणि अन्नधान्य महाग होईल. पर्यावरणीय संकटामुळे एल निनोचे दुष्काळ अधिक तीव्र होत आहेत, असा इशाराही बँकेने दिला आहे. भारतीय हवामान विभागानुसार मान्सून १२.६ टक्क्यांनी कमी पडला, जो २०१५ नंतरचा सर्वात कमकुवत मान्सून आहे. देशातील ४१ टक्के शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. २८ ऑगस्टपर्यंतची पेरणीही गेल्या वर्षीपेक्षा मागे होती: गेल्या वर्षीच्या सुमारे १,०९१ लाख हेक्टरच्या तुलनेत यंदा १,०७१ लाख हेक्टर.

मग उद्दिष्ट फुगवण्याचे कारण काय? जे सरकार दुष्काळ मान्य करते, त्याला नुकसानभरपाई द्यावी लागते आणि विम्याचे दावे निकाली काढावे लागतात. दुष्काळ नाकारणे सरकारला स्वस्त पडते.

खत, अन्नधान्य आणि इंधन

युरिया आणि डीएपीचा कोणताही तुटवडा नाही, असे सरकार सांगते. अनेक राज्यांतील शेतकरी मात्र वेगळीच परिस्थिती सांगत आहेत. जागतिक बँकेच्या नोंदीनुसार होर्मुझच्या सामुद्रधुनीतील जहाजवाहतूक विस्कळीत झाल्यावर एप्रिलमध्ये जागतिक बाजारात युरियाचा भाव दुप्पट झाला. भारत आयात खतांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे, असेही बँकेने नोंदवले आहे. खत अनुदानात १२ टक्के वाढ करूनही शेतकऱ्यांच्या तक्रारी थांबलेल्या नाहीत.

सप्टेंबरमध्ये अन्नधान्य वर्षभरापूर्वीपेक्षा ७.७४ टक्क्यांनी महाग झाले. महागाई शहरांपेक्षा (४.८८ टक्के) गावांमध्ये (६.०८ टक्के) अधिक वेगाने वाढली. शेतकरी आपला माल स्वस्तात विकतो आणि अन्नधान्य महागात विकत घेतो; मधला नफा व्यापारी खातात.

पेट्रोलियममंत्री हरदीपसिंह पुरी दावा करतात की, तेल संकटापासून जनतेचे संरक्षण करण्यात आले. जागतिक बँकेला मात्र असे आढळले की; इतर विकसनशील प्रदेशांपेक्षा दक्षिण आशियाने दिलाशाचे अधिक उपाय केले, तरीही येथे पेट्रोलचे दर जास्त वाढले. जागतिक बाजारात डिझेलचे दर कच्च्या तेलापेक्षाही वेगाने वाढले. तीन महिन्यांत पेट्रोल, डिझेल आणि गॅस खर्चापेक्षा सुमारे १.८८ लाख कोटी रुपये कमी दराने विकले गेले, हे पुरी स्वतः मान्य करतात. दुसरीकडे पंप चालवण्यासाठी लागणाऱ्या डिझेलसाठी शेतकऱ्याला जास्त पैसे मोजावे लागत आहेत.

वृद्धांना पेन्शन नाही, तरुणांना रोजगार नाही

६४ टक्के भारतीयांना सामाजिक सुरक्षा मिळते, असा पंतप्रधानांचा दावा आहे. जागतिक बँकेला आढळले की दक्षिण आशियातील केवळ १० टक्के वृद्धांनाच कोणतीही पेन्शन मिळते, आणि हे प्रमाण जगात सर्वात कमी आहे. ६५ वर्षांवरील ९१ टक्के कष्टकऱ्यांना कोणतीही रोजगार सुरक्षा नाही, आणि त्यापैकी बहुतेक शेतीत राबतात.

भारतातील जवळपास निम्मे कामगार अजूनही शेतीत आहेत, आणि शेती हे सर्वात कमी मोबदल्याचे क्षेत्र आहे. नोकरी शोधणाऱ्या तरुणांच्या संख्येच्या तुलनेत रोजगार वाढत नाही. सरकारच्याच सर्वेक्षणानुसार एप्रिल ते जून या काळात बेरोजगारी ५.४ टक्क्यांवर गेली, आणि सर्वात मोठा फटका तरुणांना बसला. बहुतेक कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरतात, अशी फुशारकी सरकार मारते; जागतिक बँकेला मात्र प्रत्यक्षात चारपैकी एकाहूनही कमी कंपन्या ती वापरताना आढळल्या.

कागदावरचा 'विकसित भारत'

पंतप्रधानांनी २०४७ पर्यंत विकसित भारताचे आश्वासन दिले आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार सुमारे २०४९ पर्यंत भारत 'वृद्ध' देश बनेल, म्हणजे दर सात जणांपैकी एक व्यक्ती ६५ वर्षांवरील असेल. अलीकडचा विकासदर कायम राहिला तरीही तेव्हा दरडोई उत्पन्न वर्षाला १०,००० डॉलरपेक्षा कमीच असेल. विकसित भारतासाठी नीती आयोगानेच दरडोई १५,००० ते १८,००० डॉलरचा निकष ठरवला आहे. बँकेच्या शब्दांत, दक्षिण आशिया श्रीमंत होण्यापूर्वीच म्हातारा होण्याची शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनुसार (आयएमएफ) सरासरी भारतीयाचे वार्षिक उत्पन्न सुमारे २,९०० डॉलर आहे, तर जपानमध्ये ते ३३,९०० डॉलर आहे. भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनल्याचा दावा सरकारने केला होता; आयएमएफने आता भारताला सहाव्या क्रमांकावर ठेवले आहे. सरकार 'ऐतिहासिक' म्हणते ती परकीय गुंतवणूक २०२५ पासून कमकुवतच राहिली आहे, असे जागतिक बँकेला आढळले. मार्च २०२५ ते जून २०२६ या काळात रुपया डॉलरच्या तुलनेत १० टक्क्यांहून अधिक घसरला, त्यामुळे आयात होणारी खते आणि इंधन महाग झाले. विकासदर ७.८ टक्क्यांवरून ७.१ टक्क्यांवर घसरत आहे, आणि जुलैमध्ये ग्राहकांचा विश्वास तीन वर्षांच्या नीचांकावर पोहोचला.

जागतिक बँकेची आकडेवारी व वस्तूस्थिती घेतो, पण ईलाज नको..!!

जागतिक बँकेचा हवाला देताना हे लक्षात घ्या की, त्यांच्या उपाययोजना म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर.

अनुदानांना कात्री आणि विजेचे खासगीकरण हीच धोरणे वीज (सुधारणा) विधेयकामागे आहेत, ज्याविरुद्ध शेतकरी लढत आहेत. सरकार ज्यांचा विचार करत आहे, ते जागतिक बँकेचे आपत्ती रोखेही (कॅटॅस्ट्रॉफी बाँड) आम्ही फेटाळतो. हे रोखे जनतेच्या पैशातून जागतिक गुंतवणूकदारांना भरघोस व्याज देतात, आणि आपत्तीने एखादा अत्यंत संकुचित तांत्रिक निकष ओलांडला तरच भरपाई देतात. आपले नुकसान ग्राह्य धरायचे की नाही, हे एखाद्या रोख्याचे सूत्र ठरवेपर्यंत शेतकरी वाट पाहू शकत नाही.

आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) कायदा २०२५ आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्याची सरकारची जबाबदारीच झटकण्याचे काम करतो. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत विमा कंपन्या नफा कमावतात, तर शेतकऱ्यांचे दावे नाकारले जातात किंवा रखडवले जातात. दिलासा ही सरकारची जबाबदारी न राहता त्याचा खासगी धंदा केला जात आहे. सार्वजनिक सिंचन, सरकारी शेतमाल खरेदी आणि कायद्याने हमी दिलेला रास्त भाव हेच खरे उत्तर आहे.

शेतकऱ्यांच्या मागण्या

अखिल भारतीय किसान सभेच्या मागण्या अशा आहेत. पावसाची तूट असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष पीक नुकसानीच्या आधारे गाव निहाय दुष्काळ जाहीर करावा आणि दुष्काळ संहितेत सुधारणा करावी. आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) कायदा २०२५ रद्द करा. आपत्ती रोखे फेटाळून मदतनिधी सरकारी अर्थसंकल्पातून द्यावा. प्रधानमंत्री पीक विमा योजनेची सार्वजनिक विमा योजना म्हणून पुनर्रचना करावी; त्यात शेतनिहाय नुकसान पंचनामा, अल्पभूधारक शेतकऱ्यांना विमा हप्ता माफ, कूळ आणि वाटेकरी शेतकऱ्यांचा समावेश आणि ३० दिवसांत दाव्यांची भरपाई असावी. शेतकरी, कूळ आणि वाटेकरी यांना पीक नुकसानीसाठी एकरी किमान ५०,००० रुपये मिळाले पाहिजेत.

आमच्या आणखी मागण्या अशा आहेत

सी २+५० टक्के सूत्रानुसार हमीभावाचा कायदा करावा आणि सर्व पिकांची खरेदी करावी.,सहकारी संस्थांमार्फत निश्चित दराने युरिया आणि डीएपी पुरवावे, आणि साठेबाजीविरुद्ध कारवाई करावी., दुष्काळात शेतीसाठी अनुदानित डिझेल आणि पंपांना मोफत वीज द्यावी., दुष्काळग्रस्त जिल्ह्यांत पीककर्जमाफी करावी., व्हीबी–जी राम जी कायदा २०२५ रद्द करावा, आणि दुष्काळी भागात जगण्याइतक्या मजुरीवर २०० दिवसांचे काम द्यावे., प्रत्येक शेतकरी आणि शेतमजुराला दरमहा किमान १०,००० रुपये पेन्शन द्यावी., ग्रामीण संकटावर श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी.

२६ नोव्हेंबर २०२० रोजी शेतकऱ्यांनी दिल्लीकडे कूच केली आणि सरकारला तीन कृषी कायदे मागे घ्यायला भाग पाडले. हमीभावाबाबत दिलेले लेखी आश्वासन आजही पूर्ण झालेले नाही. अखिल भारतीय किसान सभा शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण तरुणांना आवाहन करते की, संयुक्त किसान मोर्चाच्या देशव्यापी लढ्याचा भाग म्हणून २६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रत्येक जिल्ह्यात रस्त्यावर उतरा. सरकार टीव्ही स्टुडिओंना फसवू शकते. पण दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्याला ते फसवू शकत नाही.









दिव्यांच्या प्रकाशात माणुसकीचा शोध..!

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव, आनंदाची पर्वणी आणि नात्यांमधील जिव्हाळ्याचा सुगंध. आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या, फराळ आणि फटाक्यांच्या आतषबाजीने वातावरण उजळून निघते. घराघरांत आनंदाची लगबग सुरू होते. मात्र, या बाह्य प्रकाशाच्या झगमगाटात आपल्या अंतर्मनातील माणुसकीचा दिवा तेवढाच उजळतो आहे का, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

–पंडित पवळे शिक्षणयोगी, नांदेड

दिवाळी हा केवळ सण नसून भारतीय संस्कृतीतील जीवनमूल्यांचा उत्सव आहे. अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि वाईट प्रवृत्तींवर चांगुलपणाचा विजय ही दिवाळीची खरी शिकवण आहे. प्रभू श्रीरामांच्या अयोध्येतील आगमनाच्या आनंदापासून ते नरकासुराच्या वधाच्या स्मृतीपर्यंत अनेक पौराणिक संदर्भ या सणाला जोडलेले आहेत. परंतु, या परंपरांचा खरा अर्थ आपल्या जीवनात किती उतरतो, यावरच सणाचे सार्थक अवलंबून आहे.आज दिवाळीचे स्वरूप बदलत चालले आहे. बाजारपेठा सजल्या आहेत. विविध वस्तूंच्या खरेदीसाठी गर्दी होत आहे. सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे. महागड्या भेटवस्तू, आकर्षक सजावट आणि प्रतिष्ठेचे प्रदर्शन यांना अधिक महत्त्व मिळताना दिसते. मात्र, या झगमगाटात साधेपणा, संवेदनशीलता आणि परस्परांविषयीचा आदर हरवू नये, हीच खरी अपेक्षा.


दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या वाट्याला सारखाच येतो असे नाही. एखाद्या घरात आनंदाचे दिवे उजळलेले असतात, तर दुसऱ्या घरात आर्थिक विवंचनेचा अंधार असतो. कुणाच्या घरात मुलांच्या हसण्याने वातावरण फुललेले असते, तर कुणाच्या घरात आजारपण,एकाकीपणा आणि कौटुंबिक दुःखाची सावली असते. शेतकरी, कष्टकरी, रोजंदारीवर जगणारे कामगार, रस्त्यावर वस्तू विकणारे छोटे व्यावसायिक आणि उपेक्षित घटक यांच्यासाठी दिवाळीचा आनंद अनेकदा आर्थिक मर्यादांमध्ये अडकलेला असतो. अशा वेळी दिवाळीचा खरा प्रकाश आपल्या माणुसकीतून प्रकट व्हायला हवा. गरजू कुटुंबाला मदतीचा हात देणे, वृद्धांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, अनाथ मुलांना आनंद देणे, कामगारांच्या कष्टांचा सन्मान करणे आणि एकाकी व्यक्तींच्या जीवनात आपुलकीचा दिवा लावणे, हीच दिवाळीची खरी श्रीमंती आहे.


आपल्या घरातील पणत्या उजळताना दुसऱ्याच्या घरातील अंधारही दूर करण्याचा विचार मनात यायला हवा. कारण, माणुसकीचा प्रकाश हा कोणत्याही कृत्रिम रोषणाईपेक्षा अधिक टिकाऊ आणि प्रभावी असतो. एखाद्या दुःखी व्यक्तीला दिलासा देणारे दोन शब्द, निराश झालेल्याला दिलेली प्रेरणा आणि गरजू व्यक्तीला केलेली छोटीशी मदत, यांतून दिवाळीचा आनंद अधिक व्यापक होतो. दिवाळी साजरी करताना पर्यावरणाचे भान राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. फटाक्यांच्या धुरामुळे वायुप्रदूषण वाढते, ध्वनिप्रदूषणामुळे वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींना त्रास होतो. पशुपक्ष्यांच्या जीवनावरही त्याचे विपरीत परिणाम होतात. त्यामुळे पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करणे ही काळाची गरज आहे. मातीच्या पणत्या, नैसर्गिक सजावट, मर्यादित खर्च आणि सामूहिक आनंद यांतून सणाचे सौंदर्य अधिक खुलू शकते. आज समाजात नात्यांमधील दुरावा, वाढता स्वार्थ, असहिष्णुता आणि संवेदनशीलतेचा अभाव यांची जाणीव होत आहे. अशा परिस्थितीत दिवाळी हा नात्यांना नव्याने जोडण्याचा सुंदर अवसर आहे. जुने मतभेद विसरून संवाद साधणे, मनातील कटुता दूर करणे आणि परस्परांना समजून घेणे, यांतून जीवन अधिक समृद्ध होते. घरातील ज्येष्ठांचा आशीर्वाद, मुलांचे निरागस हास्य आणि कुटुंबातील सदस्यांचा एकत्रित सहवास यांतच दिवाळीचा खरा आनंद सामावलेला आहे. दिवाळीच्या प्रकाशाने केवळ घरे उजळू नयेत, तर मनेही उजळावीत. प्रत्येकाच्या जीवनात आशेचा किरण निर्माण व्हावा. समाजातील दुःख, विषमता आणि अज्ञानाचा अंधार दूर करण्यासाठी आपण आपापल्या परीने योगदान द्यावे. शिक्षणाचा दिवा, माणुसकीची पणती आणि सद्भावनेचा प्रकाश प्रत्येकाच्या जीवनात पोहोचावा. शेवटी, दिवाळीचा खरा अर्थ केवळ दिवे लावण्यात नाही, तर दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यात आहे. आपल्या आनंदात इतरांचा आनंद सामावून घेणे, हीच या सणाची खरी शिकवण आहे.चला, यंदाची दिवाळी केवळ घरातील दिव्यांनी नव्हे, तर माणुसकीच्या प्रकाशाने उजळवूया. कारण, दिव्यांच्या प्रकाशात माणुसकीचा शोध घेणे, हीच दिवाळीची खरी साधना आहे.











सत्तराशेसाठ गाठी असलेल्या दोरीने विनेल्या मोडक्या खाटेवर क्षिण झालेल्या व्याकुळ शेतकऱ्याने थकलेला देह झोकून दिला. बराच वेळ गुढघ्यात तोंड लपवून बसलेला बळीराजा शेतीच्या व्यवसायात दिवाळखोरी झालेल्या हतबल शेतकऱ्याची मुलगी येउन जन्मदात्या बापाला चिडून म्हणाली ''पप्पा-पप्पा तुम्ही पैसा खर्च करुन मला शाळा शिकवू शकले नाही आणि आज मी प्रौढ कुमारीका झाली. हे तुम्हास कसे समजत नाही. मला साजेसा वर शोधून हुंडा देउन माझ लग्न करुन देणे ही बापाची जबाबदारी. हे तुम्हास कसी काय समजत नाही.

– ह.सु.भगत
(दलित मित्र) मनपूर
ता. आर्णी



दरीद्रीनारायण कंगाल बळीराजा भंगार

माझे शिक्षणासाठी तुमचेकडे पैसा नव्हता, आता माझ्या लग्नासाठी पैसा नाही. असीच कुमारी राहून मी मरु का? फासी घेण्यासाठी दोर तरी आणून द्या, फासीसाठी दोर घेण्यासाठी पैसे नाही म्हणता कान नसल्यासारखे बाप ऐकून घेतो. पण काहीच बोलत नाही ऐकण्यासाठी देवाने कान दिले. कृत्रिम बहिरे होउ नका. बोलण्यासाठी देवाने तोंड दिले कृत्रिम मुके होउ नका तुम्ही जीवंत असुन आमचेसाठी मेल्यागत आहात तरी हतबल बिचारा बाप दोन कान असून बहिरा होता. तोंड असून मुका होता. इब्लीश पोरगी शिव्याशाप देउन बापाची कानपीळी केली मला शाळा शिकवण्याची माझे लग्न करुन देण्याची तुमच्यात कल्याणकारी तिळमात्र क्षमता नाही तर मला जन्म देण्यात महापाप तुम्ही का केल पोरीच घायाळ करणार बोलुन ऐकुन क्षिण आवाजात बाप म्हणाला.

''मी घाट्याच्या तोट्याच्या शेतीचा व्यवसाय करुन कंगाल झालो भंगार झालो. बापाच ऐकून पोरीच्या तळपायाची आग मस्तकात गेली ती म्हणाली'' असा निष्क्रिय बाप असण्यापेक्षा बाप नसलेला बरा अस कोणतं केलं मी पाप बिन कामाचा बेवकुब मिळाला बाप, शब्दाचे तिक्ष्ण तिर मारुन बापाला जन्म दात्याला घायाळ करुन वैतागाने क्रोधाने पाय आपटत निघुन गेली. मीट टाकुन जखमेला अधिक वेदनामय केलं, मजबूर नवऱ्यावर जहाल बायकोने आग पाखड केली. ढगाच्या गड गडाटा प्रमाणे ती नवऱ्यावर भडकली, गरजली. ''पोरीच्या लग्नासाठी पैसा नाही पोराच्या नोकरीसाठी पैसा नाही, बायकोच्या गरजा भागवण्यासाठी बायकोची हौस पुरवण्यासाठी परीवाराचे कल्याणासाठी तुमची क्षमता नाही. पैसा नाही तर माझेसी लग्न करण्यातच, दोन मुल पैदा करण्याच महापाप तुम्ही का केलं? सांगा काही तरी बोला. दोन पोटच्या मुला-मुलीनी जन्मदात्या बिचाऱ्याला आधिच घायाळ केले मरण यातने मुळे त्याची वाचाच बंद पडली. थोडा दम घेऊन बायको म्हणाली ''देवाने ऐकण्यासाठी दोन कान दिले, बोलण्यासाठी तोंड दिले. त्याचा उपयोग करा काही तरी ऐका काही तरी बोला. कान असून बहिरे होउ नका, तोंड असून असे मुके होऊ नका. असा कसा होता माझा बाप शेतकऱ्यासी माझं लग्न करण्याच केल महापाप. त्याची फळे त्याची कठोर शिक्षा मी भोगत आहे. मागेल तितका हुंडा देऊन वारेमाप पाण्यासारखा पैसा खर्च करुन राजेशाही सारखं आपले लग्न केलं हिच का त्याची फलश्रृती. अस मोठ्या खेदात म्हणाव लागतं.''

मौज मस्तीची मौज वाटली ।
नव्हती लाज शरम कुठली ।।
घरात मुलाची संख्या दाटली
।। आता संतती पोसता पोसता ।
आरपार कसी फाटली ।।
आता बोलणे भागच होते
म्हणून पराभुत सैनिका प्रमाणे
भयभित होऊन थरथरत्या
ओठाने कसा बसा बोलु लागला.
संकरीत बियाणे पेरले ते नकली
होते. म्हणून उगवलेच नाही.
बियाणेचा खर्च वाया गेला.
भरमसाठ व्याजाच कर्ज काढुन
पुन्हा पेरणी केली धोकेबाज
पावसाने धोका दिला, दगा बाजी
केली. पावसाने पलायन केले
पुन्हा आलाच नाही. उगवले थोडे
फार अंकुर पिक उष्णतेन होरपळ
झाली. आलेला खर्च वया गेला.
तिसऱ्या वेळी बियाणे पेरले. पीक
उगवले. खतपाणी दिल्यामुळे
पीक बहरुन आले. जोरात
मुसळधार पावसाने वाहुन गेले.
महापुरात. व खर्च करण्यात कष्ट
करण्यात तीळमात्र कसर केली
नाही. लहरी निसर्गामुळे कृषी
केंद्राच्या महागाईमुळे सत्यानास
झाला. काय करावे, काही सुचत
नाही काही समजत नाही.

ढग फुटीच्या मुसळधार ।
पाउस झाला मोठा जोरात ।
पीक वाहुन गेले पुरात ।
धडकी भरली माझे उरात ।।
धोंडी धोंडी पाणी दे ।
बळीराजाचे नवसाला ।।
शेतकऱ्याचे याचनेला ।
उपास कधिच नाही पावत ।।
पीकाचे नासाडीसाठी ।
अचानक येतो मात्र धावत ।।

बायको म्हणाली अस्सल
गुन्हेगार कलंदर आरोपी काही
महिने काही वर्ष केलेल्या
गुन्ह्याची शिक्षा भोगतात मी निर्दो
ष असले तरी मला जन्मठेपेपेक्षा
पुर्ण जिवनभरासाठी शिक्षा
मिळाली. नवरा मेल्यावर
बायकोच्या कपाळावरच कुंकु
पुसल्या जात असते. बायकोच
पांढर कपाळ पाहण्याच भाग्य
तुझ्या नशिबात आहे. कुंकु
पुसलेल बायकोच कपाळ
पाहण्याच भाग्य कोण्या
नवऱ्याच्या नशिबी सत ते भाग्य
तुझ्या नशिबात आहे. बायको
नवऱ्याला म्हणाली पुसुन
टाक तुझ्या हाताने माझ्या
कपाळावरच कुंकु हतबल
झालेला बिचारा नवरा गयावया
करुन म्हणाला ''अग ज्या
माझ्या हाताने तुझ्या सौभाग्याच
कुंकु लावल त्याच हाताने
तेच कुंकु मी कस काय पुसू.
बायको म्हणते मी सांगते म्हणून
पुसुन टाक काही झाल तरी मी
माझ्या बायकोच कुंकु पुसुन
टाकणार नाही अस भयभीत
होउन नवरा म्हणाला शेवटी
बायकोने तिच्याच हाताने तीच
कुंकु पुसल माझ पांढरफटक
कपाळ पाहण्याच भाग्य तुझ्या
नशिबात आहे मी मात्र कपाळ
करंटी नवऱ्याच्या हातावर
झोपेच्या दहा-पंधरा गोळ्या
घेवून तिरस्काराने म्हणाली
घ्या झोपेच्या गोळ्या खाऊन
खुशाल सुखशांतीची कायमची
झोप घ्या आणि मुक्त व्हा.
निरुपयोगी शेतकरी जीवनातून
मी पण झोपेच्या गोळ्या
खाऊन आत्महत्या करीत होते.
परंतु मुलांना कर्तव्यभ्रष्ट बाप
नसला तर चालेल संततीची
दखल त्यांचे पालन-पोषण
करण्यासाठी, त्यांचे उज्वल
भविष्य घडविण्यासाठी आई
म्हणून मी पाहिजे. त्यांना
वाऱ्यावर सोडण्याच निराधार
निराश्रीत करण्याच मी महापाप
करणार नाही. बायकोच भयानक
कठोर जहाल वक्तव्य ऐकून
नवऱ्याला पराकोटीचा पश्चाताप
झाला. सहनशीलतेची मर्यादा पार
करुन गेली. वैतागून गृहलक्ष्मी,
धर्मपत्नीच्या आज्ञेच पालन
करुन झोपेच्या गोळ्या खाऊन
कायमचा शांतमय झोपी गेला.

शेती व्यवसायान विघ्न
संतोषी पावसामुळे कृषी
केंद्राच्या, शेत मजुराची मजुरी,
अती महागाई शेतकऱ्यांसाठी
घातक ठरते. जन्मभर काबाडकष्ट
करुन बळीराजा कृषी प्रधान
देश धनधान्यांनी समृध्द करतो,
सुजलाम् सुफलाम् करतो. हाच
जगाचा पोशिंदा असणाऱ्या
बळीराजाचा अक्षम्य गुन्हा.

कृषी प्रधान भारत देशात
राष्ट्राचा कणा असणाऱ्या
शेतकऱ्याची प्रतिष्ठा रसातळाला
गेली. शेतकरी कवडीमोल
झाला, मातीमोल झाला.
भूमीपुत्राला आता मुलगी
देण्यास मुलीचा बाप कचरतो,
प्रतीसाद देत नाही. मुलगी तर
सडेतोड सांगते शेतकरी नवरा
नको शेती पुत्राची ही होणारी
अशी कुचंबना खेद जनक आहे.
ह्याची खंत मनाला वाटते.

आजची परिस्थिती पाहता
हजारो तरुण शेतकरी बिनलग्नाचे
फिरतांना आढळून येतात.
याचे कारण म्हणजे मुली
मिळेनाशा झाल्या आहेत. ही
बाब समाजासाठी चिंताजनक
आहे. बहुतेक सर्व लोकाच्या
बायका मोठ्या हौशीनं दररोज
सकाळी अगदी न विसरता
कपाळी कुंकु लावतात.
कमनशिबी अभागी शेतकरी
नवऱ्याला त्याची बायको कुंकु
पुसुन पांढर कपाळ करायच
सांगते. हा असा जगा वेगळा
विक्षिप्त क्लेशदायक विकृत
प्रकार शेतकऱ्याच्या नशिबित
आहे. नवऱ्याला पती परमेश्वर
समजून त्याला दिर्घ आयुष्य
लाभो पुढील जन्मात हाच
नवरा मिळावा यासाठी बायको
प्रत्येक वर्षी वटपौर्णिमेच्या
दिवशी वटवृक्षाला धागा गुंडाळून
प्रदर्षणा घालून ईश्वराकडे प्रार्थना
करते. शेतकऱ्याची बायको
नवऱ्याला फाशी घेण्यासाठी
त्याच्या गळ्याला दोर गुंडाळते.
कथा-पुराणात पतीव्रता बायको
ईश्वरचरणी सतीसावित्री मनोभावे
प्रार्थना करते. याचना करुन
मृत नवऱ्याला जीवंत करते.
आणि शेतकऱ्याची बायको
जीवंत नवरा मृत करण्यासाठी
सक्रीय असते. असा हा जगा
वेगळा न्याय शेतकऱ्याच्या
नशिबी दिसून येतो.

पुर्वार्ध आयुष्यात टाहो
फोडून आक्रोश करुन छाती
ठोकपणे शेतकरी सांगत होता.
मी कृषी प्रधान देशाचा जगाचा
पोशिंदा बळीराजा आहे. धन
धान्याच विक्रमी उत्पादन करुन
देश बलशाली करतो. या रसाळ
शब्दाची वांझोटी मुक्ताफळे
असते. पितळी अक्षराला
सुवर्णाचं पॉलीश असते खर
काहीच नसते. शेतकरी नवरा
नको ग बाई आजच्या लग्नाच्या
पोरी निर्भिडपणे सांगतात. जगी
सर्व दुखी कोण आहे अस मला
कोणी विचारल तर क्षणाचाही
विलंब न करता झटपट सांगेन
जगी सर्व दु:खी शेतकरी आहे
त्याची बायको आहे.

सुखके सब साथी
दु:ख में न कोई
कठीन समय येता
कोण कामास येई
जय जवान जिंदाबाद !
जय किसान जिंदाबाद !!

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
बळीराम पाटील मिशन, मांडवी संचलित,
श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
श्रीक्षेत्र माहूर जि.नांदेड व
उत्तम राठोड अध्यापक विद्यालय, श्रीक्षेत्र माहूर जि. नांदेड
- शुभेच्छुक -


मा. प्रफुल्ल प्रकाश राठोड
अध्यक्ष


मा. सौ. संध्याताई प्रफुल्ल राठोड
सचिव


नकुल प्रफुल्ल राठोड
सहसचिव

दिवाळी निमित्त सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा...!
धर्माबाद नगरपरिषद धर्माबाद
ता.धर्माबाद जि.नांदेड-४३१८०९
इमेल-codharamaba@gmail.com
फोन नं.०२४६५२४४१२९
जा.क्र.धनपा/कार्यालयीन/२०२६/५१४६
दिनांक ६/११/२०२६

जाहीर आवाहन

धर्माबाद शहरातील सर्व सुजान नागरीकांना सूचित करण्यात येते की, आपल्या परिसरात कोणत्याच प्रकारचे संसर्ग आजार पसरु नये म्हणून प्रतिबंधक उपाययोजना अंतर्गत खालील बाबींचे पालन करुन साथ रोगास आळा घालण्याच्या कामी नगरपरिषदेस सहकार्य करावे.
१. नागरीकांनी आपला परिसर स्वच्छ ठेवण्याच्या कामी नगरपरिषदेस सहकार्य करावे व घरातील केर कचरा घंटागाडीतच टाकावे.
२. घरातील कचरा ओला व सुका वेगवेगळे करुन द्यावे.
३. प्लॉस्टिक व सिंगल युज प्लॉस्टिकवर शासनाने बंदी घातल्यामुळे प्लॉस्टिक व कॅरिबॅगचा वापर करु नये.
४. शहरातील मालमत्ता धारकांनी दि.३१/१२/२०२६ पुर्वी नगरपरिषदेची थकीत मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व गाळेभाडे तात्काळ नगरपरिषदेस भरणा करुन सहकार्य करावे.
५. नागरीकांनी शौचालयाचा वापर दररोज करावे आणि उघड्यावर शौचास बसू नये.
६. नळाला तुट्या नसल्यास त्वरीत नळाला तुट्या बसवून पाण्याचा अपव्यय टाळावा.
७. आपले पाळीव जनावरे मोकाट सोडु नये बांधून ठेवण्यात यावे.
८. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी लवकरात लवकर घेऊन बांधकामास सुरुवात करावी. अन्यथा आपले नांव मंजूर यादीतून कमी करण्यात येईल.
९. जन्म-मृत्यूची नोंदणी वेळेवर करण्यात यावे.
१०. नगरपरिषद धर्माबाद तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात नागरीकांनी सहभाग नोंदवावा.
११. स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी अभियानांतर्गत दिवाळी सण साजरा करण्यासाठी पर्यावरणपुरक स्थानिक उत्पादनांचा वापर करावा.
१२. टाकाऊ पासुन टिकाऊ वस्तू तयार करणे तसेच QR (Reuse,Reduse Recycle) तत्वाची अंमलबजावणी करावी.
१३. प्रदुषण टाळावे, हरित दिवाळी साजरी करावी.
१४. स्वच्छ दिवाळी साजरी करुया आणि स्वच्छ दिवाळी मोहिमेत सहभाग नोंदवुया.

'स्वच्छ धर्माबाद, सुंदर धर्माबाद''

स्वाक्षरीत/-
सौ.संगीता महेश बोलमवार
नगराध्यक्षा
धर्माबाद नगरपरिषद धर्माबाद

स्वाक्षरीत/-
श्री.बोलमवार महेश नारायण
उपनगराध्यक्ष
धर्माबाद नगरपरिषद धर्माबाद

स्वाक्षरीत/-
कौस्तुभ गव्हाणे
मुख्याधिकारी
धर्माबाद नगरपरिषद धर्माबाद

दीपावली निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा...
नगरपरिषद कंधार
आनंददायी, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित दीपावली !
चला, दिवे लावूया ! प्रदूषण टाळूया !
जनहितार्थ आवाहन

स्वच्छता विभाग
- आपला परिसर स्वच्छ ठेवावा व घरातील कचरा घंटागाडीतच टाकावा.
- कचरा ओला व सुका वेगवेगळा करुन द्यावा,
- सिंगल युज प्लास्टिक व कॅरीबॅगचा वापर करु नये
- 3'R' (Reduce,Reuse,Recycle) तत्वाचा अवलंब करावा,
- प्रदूषण टाळावे, हरित दिवाळी साजरी करावी.

पाणी पुरवठा विभाग
- पाणी आहे तर जीवन आहे... पाणी जपा, पाणी वाचवा!
- नळ सुरु ठेवून पाणी वाया घालवू नये.
- वाहन धुणे, रस्ते धुणे किंवा इतर अनावश्यक कारणांसाठी पाण्याचा अपव्यय करु नये.
- घरगुती नळ व जलवाहिनीतील गळतीकडे दुर्लक्ष करु नये, त्वरित दुरुस्ती करावी.

कर विभाग
- शहरातील मालमत्ता धारकांनी नगरपरिषदेची थकीत मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व गाळेभाडे तात्काळ भरावे.
- कर भरुन नगरपरिषदेस सहकार्य करावे आणि शहराच्या विकासात भागीदार व्हावे.

महत्त्वाची सूचना: फटाके फोडताना काळजी घ्या, अपघात टाळा!
- फटाके नेहमी मोकळ्या जागेत फोडावेत. घरात, बंदिस्त जागेत किंवा वाहनांजवळ फटाके फोडू नयेत.
- लहान मुलांनी फटाके फोडताना घरातील मोठ्यांनी त्यांच्यासोबत राहून सुरक्षिततेची काळजी घ्यावी.
- सुती कपडे वापरावेत आणि फटाके फोडताना पाण्याची बादली व वाळू जवळ ठेवावी.
- फटाके हातात धरुन किंवा खिशात ठेवून फोडू नयेत.
- रुग्णालये, पेट्रोल पंप व ज्वलनशील पदार्थांच्या ठिकाणी फटाके फोडू नयेत.

आपले नम्र
श्री.संदीप भोळे (मुख्याधिकारी)
श्री.अब्दुल मन्नान म.सरवर (उपाध्यक्ष)
श्री.शहाजी अरविंदराव नळगे (अध्यक्ष)
नगरपरिषद कंधार

भोकर नगरपरिषद,भोकर जि.नांदेड

मुख्य प्रशासकीय इमारत
नांदेड रोड,भोकर, ता.भोकर, जि.नांदेड-४३१८०१

ईमेल :- cobhokar1@gmail.com
जा.क्र./नपभो/का.वि./२०२६/

दूरध्वनी क्र.(०२४६७) २२२२९९-२२३३९९
दि.

सर्व जनतेस
दीपावली
निमित्त मन:पूर्वक शुभेच्छा!

जाहिर आवाहन

भोकर शहरातील सर्व नागरिकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की,

१. ज्या मालमत्ता धारकांकडे मालमत्ता कर पाणीपट्टी बाकी आहे त्यांनी आपल्या कडील थकीत व चालू कराचा तात्काळ भरणा करावा.
२. कचऱ्याचे विलगीकरण करुन ओला व सुका कचरा वेगवेगळा करुनच नगर परिषदेच्या घंटागाडीत टाकावा.
३. कचरा उघड्यावर टाकू नये. टाकल्यास आपणास नगर परिषदेद्वारे दंड आकारला जाईल.
४. पाण्याचा अपव्यय टाळा: पिण्याचे पाणी, भांडी घासणे, कपडे धुणे आणि स्वच्छतेसाठी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करा.
५. पाण्याचा पुनर्वापर करा: भाजीपाला किंवा तांदुळ धुतलेले पाणी फेकून न देता ते झाडांना घाला.
६. पाण्याची गळती रोखा: घरातील किंवा सार्वजनिक ठिकाणचे नळ गळत असल्यास ते तातडीने दुरुस्त करा.
७. रेन वॉटर हार्वेस्टिंग: पावसाचे पाणी साठवण्यासाठी छतावरील पाणी जमिनीत जिरवण्याची व्यवस्था करा.
८. नळांना तुट्या नसल्यास त्वरित तुट्या बसवून घ्या.
९. वृक्षारोपण करा: झाडे लावल्यास आणि ती जगवल्यास भविष्यात दुष्काळाची तीव्रता कमी होण्यास मदत होते.
१०. अनधिकृत बॅनर व पोस्टर लाऊ नका, नगर परिषदेची परवानगी घेऊनच बॅनर व पोस्टर लावा.
११. आपल्या कुटुंबासह प्रदूषण मुक्त व सुरक्षित दिवाळी साजरी करावी.

'कर भरा जप्ती टाळा'

'पाणी हेच जीवन आहे, आणि त्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे.
आज आपण पाण्याचा सन्मान केला, तरच उद्याचे भविष्य सुरक्षित राहील!'

शुभेच्छुक

श्री.भगवान नारायणराव दंडवे नगराध्यक्ष
श्री.दिलीप गुरप्पा सोनवाडे उपनगराध्यक्ष
श्री.ऋषभ विठ्ठलराव पवार मुख्याधिकारी

सर्व सन्माननीय सभापती, नगरसेवक, नगरसेविका, नगरपरिषद,भोकर

कार्यालय देगलूर नगरपरिषद देगलूर जि.नांदेड

फोन नं.(०२४६३) २५७६२४ फॅक्स नं.(०२४६३) २५५७७७ E-Mail codegloor@gmail.com
विभाग-आरोग्य न.पा.जा.क्र./ /२०२६ दि.२९/१०/२०२६

जाहिर आवाहन

समस्त नागरिकांना आवाहन करण्यात येते की, दिवाळी हा आनंदाचा, प्रकाशाचा आणि उत्साहाचा सण आहे. हा सण साजरा करताना पर्यावरणाचे संरक्षण करणे, ध्वनी व वायुप्रदूषण टाळणे आणि सर्वांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये रस्ते, पदपथ व सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजविण्यास बंदी आहे. तसेच शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, न्यायालये व धार्मिक स्थळे यासारख्या शांतता क्षेत्रात फटाके वाजविण्यास सक्त मनाई आहे. सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये लेझर व बीम लाईटचा वापर करण्यासही बंदी असून, आवाजाची तीव्रता मोजण्यासाठी यंत्र बसविणे बंधनकारक आहे.

त्यामुळे यावर्षीची दिवाळी प्रदूषणमुक्त, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित पद्धतीने साजरी करण्यासाठी सर्व नागरिकांनी पुढील बाबींचे पालन करावे.

* मातीच्या पणत्या व दिव्यांचा वापर करा आणि आपल्या घरात आनंदाचा प्रकाश पसरवा.
* फटाक्यांचा वापर टाळा किंवा शक्य तितका मर्यादित ठेवा.
* मोठ्या आवाजाचे फटाके फोडणे टाळा. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि प्राणी यांना ध्वनी प्रदूषणाचा त्रास होणार नाही याची काळजी घ्या.
* फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण टाळून हवेची गुणवत्ता राखण्यास सहकार्य करा.
* प्लास्टिक व इतर घातक साहित्याचा वापर टाळा. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावा आणि परिसर स्वच्छ ठेवा.
* दिवाळीच्या फराळासोबत पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश नातेवाईक, मित्रपरिवार व शेजाऱ्यांपर्यंत पोहोचवा.

सर्वांना दीपावली च्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

मा.सौ.विजयमाला बालाजीराव टेकाळे नगराध्यक्षा नगर परिषद देगलूर
मा.ॲड.अंकुश सुरेशराव देसाई उपनगराध्यक्ष नगर परिषद देगलूर
मा.श्रीमती निलम कांबळे मुख्याधिकारी नगर परिषद देगलूर



कार्यालय कृषि उत्पन्न बाजार समिती, नांदेड

तर्फे सर्व शेतकरी बांधव आडत हमाल, मापाडी व सर्व बाजार घटकांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...

शेतकऱ्यांकरिता उपलब्ध सुविधा व योजना

१) शेतकऱ्यांचा शेतमाल हळद व इतर भुसार शेतमाल लिलावासाठी वेगवेगळे भव्य दोन ऑक्शन हॉल
२) शेतकऱ्यांचा शेतमाल साठवणुकीसाठी भव्य सात टिनशेड
३) बाजार आवारात सर्वत्र सिमेंट रोड व्यवस्था
४) बाजार आवारात बँक इमारत, पोस्ट ऑफिस व्यवस्था उपलब्ध
५) बाजार आवारात हायमास विद्युत लाईट व्यवस्था
६) शुध्द पाणी पुरवठा. शौचालय व साफसफाई व्यवस्था
७) शेतमाल घेऊन येणाऱ्या वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था
८) शेतकरी व्यापाऱ्यांचे शेतीमालाचे वजनमापासाठी ५० मे. टन क्षमतेचा इलेक्ट्रॉनिक वजनकाटा
९) बाजारभाव प्रक्षेपण संगणक व्यवस्था, सिसिटीव्ही व्यवस्था
१०) परवानाधारक तोताराकडुन अचुक वजनमापाची व्यवस्था
११) कार्यक्षेत्रांतर्गत कापुस उत्पादक शेतक-यांसाठी भारतीय कपास निगम लि. याव्दारे हमीभावाने कापुस खरेदी करण्यात येतो.
१२) भविष्यकालीन योजना शेतक-यांकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजने अंतर्गत शेतकरी भवन बांधकाम प्रगती पथावर आहे.

शुभेच्छुक

भुजंगराव विठ्ठलराव पाटील उपसभापती
गणेश संभाजीराव भारसावडे प्र. सचिव
संजय अण्णासाहेब लहानकर सभापती

व संचालक मंडळ : भगवानरावजी आलेगावकर,शामराव पा. टेकाळे, नागोराव आढाव, सत्यजित (सुमित) भोसले, गांधीजी पवार, निलेश देशमुख, सौ. गायत्री कदम, सौ. कमलबाई वाघ, खोबाजी (बबनराव) बारसे, निळकंठ मदने, गंगाधर (पिंटु) शिंदे, ज्ञानेश्वर राजेगोरे, नाना पोहरे, ओमप्रकाशजी पोकर्णा, सदाशिवराव देशमुख, शिवाजी दराडे